सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ३० जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आणीबाणी लादणाऱ्यांनी संविधानाची हत्या केली - पंतप्रधान

नवी दिल्ली : देशावर आणीबाणी लादण्यात आली, त्या घटनेला काही दिवसांपूर्वी पन्नास वर्षे पूर्ण झाली. आपण देशवासियांनी संविधान हत्या दिवस पाळला. आपण नेहमी त्या सर्व लोकांचे स्मरण करायला हवं, ज्यांनी नेटाने आणीबाणीचा सामना केला होता. यामुळे आपल्याला आपल्या संविधानाला सशक्त राखण्यासाठी निरंतर सजग राहण्याची प्रेरणा मिळते. आणीबाणी लादणाऱ्यांनी केवळ आपल्या संविधानाची हत्या केली नाही, तर त्यांचा हेतू न्यायपालिकेलाही आपले गुलाम बनवून ठेवण्याचा होता, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. 'मन की बात' (१२३ वा भाग) कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, आणीबाणीच्या काळात लोकांवर अत्याचार झाले. अनेकांना क्रूर छळ देण्यात आले. मिसा अंतर्गत, कोणालाही अशाच प्रकारे अटक करता येत होती. त्यांच्यावर असे अमानुष अत्याचार करण्यात आले. शेवटी, जनतेचा विजय झाला आणि आणीबाणी उठवण्यात आली. जनतेचा विजय झाला आणि आणीबाणी लादणारे हरले. या काळात लोकांना मोठ्या प्रमाणावर त्रास दिला गेला. याची अशी अनेक उदाहरणे आहेत, जी कधीही विसरता येणार नाहीत, अशा शब्दात पंतप्रधान मोदी यांनी आणीबाणीच्या काळाचे स्मरण केले.

एपिसोडच्या सुरुवातीला त्यांनी योग दिनाबद्दल सांगितले. ते म्हणाले की, २१ जून रोजी देश आणि जगातील कोट्यवधी लोकांनी आंतरराष्ट्रीय योग दिनात भाग घेतला. योगाची भव्यता वाढत आहे, लोक ते त्यांच्या दैनंदिन जीवनात स्वीकारत आहेत. यावेळी आम्हाला योग दिनाचे आकर्षक फोटो दिसले. विशाखापट्टणममध्ये ३ लाख लोकांनी एकत्र योगा केला. आपल्या नौदलाने जहाजांवर योगा केला आणि जम्मूमध्ये लोकांनी जगातील सर्वात उंच पुलावर योगा केला. वडनगरमध्ये २१०० लोकांनी एकत्र



भुजंगासन करून विक्रम केला. दोन हजारांहून अधिक आदिवासी विद्यार्थ्यांनी १०८ मिनिटांमध्ये १०८ सूर्यनमस्कार घातले. विचार करा, किती शिस्तीचं पालन आणि समर्पण असेल. तेलंगणामध्ये तीन हजार दिव्यांग मित्र एकत्रितपणे योग शिबिरात सहभागी झाले. त्यांनी दाखवून दिलं की कशा प्रकारे योग सशक्तीकरणाचे देखील माध्यम आहे. दिल्लीच्या लोकांनी योगला स्वच्छ यमुनेच्या संकल्पाशी जोडलं आणि यमुना किनारी जाऊन योगसाधना केली. हिमालयाची बर्फाच्छादित शिखरं आणि 'आयटीबीपी'चे जवान, तिथे देखील त्यांनी योगाभ्यास केला, साहस आणि साधना एकत्र पाहायला मिळाले. गुजरातच्या लोकांनी देखील एक नवीन इतिहास रचला. न्यूयॉर्क, लंडन, टोकियो, पॅरिस जगातल्या प्रत्येक मोठ्या शहरांमधील योगदिनाची छायाचित्रं समोर आली आहेत आणि प्रत्येक छायाचित्रात एक गोष्ट खास राहिली आहे, शांतता, स्थैर्य आणि संतुलन. या वर्षाची संकल्पना अतिशय खास होती, धेसर षीं जपश एर्रींह, जपश क्शरश्रींह, म्हणजे एक पृथ्वी एक आरोग्य. ही केवळ एक घोषणा नाही तर एक दिशा आहे जी आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम्'ची जाणीव करून देते. मला विश्वास आहे, यावर्षीची योग दिनाची भव्यता जास्तीत जास्त लोकांना योग साधनेचा अवलंब करण्यासाठी नक्कीच प्रेरित करेल.

प्रदीर्घ काळानंतर कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे. कैलास मानसरोवर म्हणजेच भगवान शिव यांचं धाम. हिंदू, बौद्ध, जैन प्रत्येक परंपरेत कैलास हे श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र मानलं गेलं आहे. मित्रांनो, तीन जुलैपासून पवित्र अमरनाथ यात्रा सुरू होणार आहे आणि पवित्र श्रावण महिना देखील काही दिवसांवर आला आहे. आत्ताच काही दिवसांपूर्वी आपण भगवान जगन्नाथ जी यांची रथयात्रा देखील पाहिली. ओदिशा असेल, गुजरात असेल किंवा देशातला कुठलाही कानाकोपरा असेल, लाखो श्रद्धाळू या यात्रांमध्ये सहभागी होतात. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत या यात्रा 'एक भारत श्रेष्ठ भारत' भावनेचे प्रतिबिंब आहेत. जेव्हा आपण श्रद्धा भावनेनं, पूर्ण समर्पणानं आणि शिस्तबद्धतेनं आपल्या धार्मिक यात्रा पार पाडतो तेव्हा त्याचं फळ देखील मिळतं. यात्रेला जाणाऱ्या सर्व सौभाग्यशाली श्रद्धाळूंना मी माझ्या शुभेच्छा देतो. जे लोक सेवाभावनेनं या यात्रा यशस्वी आणि सुरक्षित बनवण्यासाठी झटत आहेत त्यांना देखील मी शुभेच्छा देतो.

देशातल्या दोन अशा यशस्वी कामगिरीबाबत सांगू इच्छितो ज्यामुळे तुमचा ऊर अभिमानाने भरून येईल. या कामगिरीची चर्चा जागतिक संस्था करत आहेत. डब्ल्यूएचओ म्हणजेच जागतिक आरोग्य संघटना आणि आयएलओ म्हणजेच आंतरराष्ट्रीय श्रम संघटना यांनी देशाच्या या उपलब्धींची भरपूर प्रशंसा केली आहे. पहिली कामगिरी आहे ती आपल्या आरोग्याशी निगडित आहे.

## दोन लाखांच्या बनावट नोटासह तिघे जेरबंद ; राहुरी पोलिसांची कारवाई

राहुरी : राहुरी पोलिसांच्या पथकाने शनिवारी मध्यरात्री शहराच्या हद्दीत मोठी कारवाई करत दोन लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन आलेल्या तीन आरोपींना सापळा लावून त्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अहिल्यानगर येथून तीन इसम बनावट नोटा घेऊन दुचाकीवर राहुरीकडे येत असल्याची गुप्त माहिती राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना शनिवारी दि. २८ जून रोजी रात्री ११ वाजण्याचे दरम्यान मिळाली. सदर माहितीच्या अनुषंगाने संजय ठेंगे यांनी ताबडतोब एक पोलिस पथक बरोबर घेऊन राहुरी शहरातील नगर मनमाड रस्त्यावर गाडगे महाराज आश्रम शाळा परिसरात सापळा लावला. काही वेळाने तेथे एम एच ४५ वाय ४८३३ क्रमांकाच्या दुचाकीवर तिन इसम आले असता, पोलिस पथकाने त्यांना जागेवरच झडप घालून पकडले. पथकाने त्यांची अंग झडती घेतली असता त्यांच्या जवळ २ लाख रुपयांच्या २०० व ५०० रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या. क्सीस बँक राहुरी शाखेचे मॅनेजर कैलास वाणी यांनी घटनास्थळी सदर नोटा बनावट असल्याची खात्री केली. त्यानंतर पथकाने मुद्देमाल जप्त करून आरोपींना गजाआड केले.

हवालदार सुरज गायकवाड यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी पप्पु ऊर्फ प्रतीक भारत पवार, वय ३३ वर्ष, रा. अर्जुन नगर, ता. करमाळा, जि. सोलापुर, तसेच राजेंद्र कोंडीबा चौघुले, वय ४२ वर्षे, तात्या विश्वनाथ हजारे, वय ४० वर्षे, दोघे रा. पाटेगांव, ता. कर्जत जि. अहिल्यानगर या तिघांवर गुन्हा रजि. नं. ७२४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपी २०० व ५०० च्या बनावट नोटा राहुरी शहरात कोणाला देण्यासाठी आले होते? त्यांनी नोटा कोठून आणल्या? यामध्ये आणखी कोण कोण सामील आहेत? या बाबतचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे हे करीत आहे.सदरची कारवाई पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, पोलिस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, राजू जाधव, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढोकणे, नदिम शेख, सतिष कुऱ्हाडे, अंकुश भोसले, चालक शकुर सय्यद आदि पोलिस पथकाने केली.

## केरळच्या शाळांमध्ये झुंबा सक्ती

कोझिकोड : अमली पदार्थविरोधी मोहिमेचा भाग म्हणून शाळांमध्ये झुंबा नृत्याचे शिक्षण बंधनकारक करण्याचा निर्णय केरळ सरकारने घेतला आहे. काँग्रेसचा या निर्णयाला विरोध आहे. विशिष्ट नृत्य प्रकार शिकण्याची सक्ती विद्यार्थ्यांवर करणे योग्य नाही, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. तर विरोध झाला तरी निर्णय बदलणार नाही, असे स्पष्ट संकेत केरळचे मुख्यमंत्री आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे नेते पिनरायी विजयन यांनी दिले आहेत.

शिक्षणमंत्री व्ही. शिवनकुट्टी यांनी झुंबा सक्ती या विषयावर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस निरर्थक वाद निर्माण करत असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, असा कोणताही निर्णय केरळ सरकारने घेतलेला नाही आणि घेणार नाही; असे ते म्हणाले.

झुंबा शाळेत शिकवण्यामागे केरळ सरकारची स्पष्ट अशी एक भूमिका आहे. ती समजून घेण्याच्या उद्देशाने होणाऱ्या चर्चेचे स्वागत आहे. पण विरोधासाठी होणाऱ्या विरोधाला डावलले जाईल; असे शिक्षणमंत्री व्ही. शिवनकुट्टी यांनी सांगितले.

## रशियाचा युक्रेनवर सर्वात मोठा हवाई हल्ला, एफ-१६ लढाऊ विमानाचा पायलट ठार

क्कीव: युक्रेनच्या हवाई हद्दीवर रशियाचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले आहे की, या हल्ल्यात एफ-१६ लढाऊ विमानाचा पायलट मृत्युमुखी पडला आहे. काही दिवसांपूर्वीच नाटो शिखर परिषद संपल्यानंतर रशियाने हा हल्ला केला आहे. या शिखर परिषदेत जगातील सामर्थ्यवान राष्ट्रप्रमुखांनी ३ वर्षांपासून सुरू असलेले हे रशिया युक्रेन युद्ध लवकर संपवण्याचे आवाहन केले होते.

तीन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धात रशियाने केलेला हा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. या हल्ल्यात युक्रेनच्या एफ-१६ लढाऊ विमानाचा पायलट मृत्युमुखी पडला आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले आहे की रशियाने रात्रभर ५३७ शस्त्रांसह युक्रेनवर हवाई हल्ला केला आहे. त्यात ४७७ ड्रोन आणि ६० क्षेपणास्त्रे होती. या हल्ल्याची माहिती देताना अध्यक्ष झेलेन्स्की म्हणाले की, या हल्ल्यातील दुःखद भाग म्हणजे रशियन हल्ल्याला



निष्क्रिय करण्यात गुंतलेले एफ-१६ विमानाचे पायलट मॅक्सिम उस्टेन्को रशियन हल्ल्याच्या तावडीत सापडले आणि त्यांचा मृत्यू झाला.

झेलेन्स्की पुढे म्हणाले की, या एफ-१६ च्या पायलटनी शत्रूची ७ हवाई लक्ष्ये नष्ट केली आहेत. त्यांच्या कुटुंबियांना आणि सहकाऱ्यांना माझी संवेदना. त्यांच्या मृत्यूच्या सर्व परिस्थितीची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

झेलेन्स्की यांच्या मते, रशियाने ज्या ड्रोनने हल्ला केला त्यापैकी बहुतेक ड्रोन इराणमध्ये बनवले गेले होते. ते पुढे म्हणाले की, स्मिला येथील एक निवासी इमारत देखील या रशियन सैन्याच्या हल्ल्यांत लक्ष्य बनली आहे. ज्यामध्ये एक लहान मूल जखमी झाले. रशियावर टीका करताना युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले की, 'मोस्कोकडे मोठे हल्ले करण्याची क्षमता आहे तोपर्यंत ते थांबणार नाही.' या आठवड्यातच ११४ हून अधिक क्षेपणास्त्रे, १,२७० हून अधिक ड्रोन आणि सुमारे १,१०० ग्लाइड बॉम्ब डागण्यात आले आहेत. जगाच्या शांततेच्या आवाहनाला न जुमानता पुतिन यांनी युद्ध सुरू ठेवण्याचा निर्णय खूप आधीच घेतला होता.




# आमचे नाव बाजूला ठेवा पण बोरामणी विमानतळ झाले पाहिजे : सुशीलकुमार शिंदे

## पत्रकार प्रशांत माने लिखित 'लोकाभिमुख पत्रकारिता' पुस्तकाचे प्रकाशन

सोलापूर : सोलापूर शहराच्या आत असलेले विमानतळ किती दिवस टिकणार ? आम्ही आडवे घालणार नाही. सत्ता त्यांची आहे त्यांनीच मार्ग काढला पाहिजे. आम्ही कोणत्याही कामाचे श्रेय घेतले नाही. बोरामणी विमानतळासाठी प्रयत्न केले. जागा दिली. आमचे नाव बाजूला ठेवा पण सोलापूर शहराच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीयस्तराचे बोरामणी विमानतळ झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली. संपादक प्रशांत माने हे चिंतनशील पत्रकार आहेत. त्यांचे लोकाभिमुख पत्रकारिता पुस्तक वाचनीय असून नव्या पत्रकारांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

पत्रकार प्रशांत माने लिखित आणि जागृती प्रकाशन प्रकाशित लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आज रविवारी होटगी रोड गांधीनगर येथील हेरिटेल गार्डन येथे प्रमुख अतिथी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने, दैनिक तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, ज्येष्ठ संपादक तथा स्वागताध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते थाटात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे पुढे म्हणाले, निवडणुकीत ज्यांना विजय मिळेल असे वाटते, तो पडला जातो. सोलापुराकरांनी मला सर्वसाधारण जागेवर दोनदा खासदार केले मात्र राखीव जागेवर माझा पराभव झाला. आम्ही प्रभावीपणे काम केले. लोकांनी ते स्वीकारले नाही. नाराज न होता काम केले पाहिजे. ते आम्ही करत आहोत. लोकशाहीत चिंतन केले पाहिजे. सोलापूरला रंगाअण्णा वैद्य यांच्यासह अभ्यासपूर्ण पत्रकारांचा मोठा वारसा आहे. रंगाअण्णा वैद्य यांनी काल आणि आजच्या पिढीला पत्रकारिता कशी असावी याचा आदर्श घालून दिला. पत्रकार प्रबोधन करणारा असला पाहिजे.त्याचप्रमाणे पत्रकार प्रशांत माने हे चिंतनशील पत्रकार आहेत. तीस वर्षाच्या पत्रकारितेत त्यांनी जे अनुभवले, लिहिले ते त्यांनी पुस्तकातून मांडले आहे. त्यांचे विचार सामाजिक समतेचे आहेत. पत्रकारिता करताना सार्वजनिक जीवनात लोकांना काय पाहिजे ते दिले पाहिजे. तशा उपयुक्त बातम्या देण्याचे काम पत्रकार माने यांनी केले आहे, असे गौरवोद्गार माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकशिक्षण आणि प्रबोधन केले. पत्रकार प्रशांत माने यांचे पुस्तक नव्या पत्रकारांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. पत्रकारितेचा वारसा नसतानाही त्यांनी तब्बल तीस वर्षात आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रश्न मांडले. महसूल खात्यातील योजनांच्या अनियमिततेवर प्रकाश टाकला. त्याची दखल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली. त्यावर चर्चा झाल्या. अनुदान थेट बँकेच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली. पत्रकार सुद्धा चांगल्या गोष्टी करू शकतात हेच या माध्यमातून दाखवून दिले.

दैनिक तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे यांनी प्रशांत माने यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुस्तकांने दैनिक तरुण भारतच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, असे गौरवद्गार काढले.

लेखक प्रशांत माने यांनी प्रस्ताविकात लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तक लेखनामागील उद्देश स्पष्ट केला. या पुस्तकातून बातम्यांची कात्रणे देखील नवोदित पत्रकारांना अभ्यासासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. पत्रकारांचे राजकीय आणि सामाजिक ऋणानुबंध कसे असावेत ? यावर देखील पुस्तकातून छायाचित्रांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. वाचकांसह नवोदित पत्रकारांच्या पसंतीस पडेल, असे प्रशांत माने यांनी सांगितले.

स्वागताध्यक्ष राजा माने म्हणाले, लोकाभिमुख पत्रकारिता हा सोलापूरच्या पत्रकारितेचा आत्मा आहे. विविध विकास कामे आणि प्रश्नांसाठी सोलापूरच्या पत्रकारांनी लोकप्रतिनिधींच्या दहापट शक्ती पणाला लावली. पत्रकारितेतील सुवर्णकाळ आणि अनुभवला आहे. इशू बेस पत्रकारिता राहिली आहे का असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. आज डिजिटल मीडियाचे युग आहे. बिझनेस मॉडेल पूर्ण बदलले आहे. त्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. पत्रकारितेचे मूल्य, सामाजिक बांधिलकीचा विसर न पडता कार्यरत राहिले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी गंभीरे यांनी केले. अक्षय माने यांनी आभार मानले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पत्रकारितेचे स्वरूप बदलत आहे : माजी उपमुख्यमंत्री मोहिते- पाटील

स्वातंत्र्य लढ्यात पत्रकार पुढे होते. सरकारी यंत्रणेच्या चुका त्यांनी दाखवल्या. लोकशाहीतील इतर तीन खांबावर त्यांनी अंकुश ठेवण्याचे काम केले. पत्रकारितेचे स्वरूप बदलत आहे. विकास कामांना प्रसिद्धी देणे गरजेचे आहे. ज्यांना आवाज नाही त्यांचा आवाज होऊन न्याय देणे ही पत्रकारांची खरी जबाबदारी आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या वृत्तपत्राचे नाव मूकनायक ठेवले होते, असे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील म्हणाले.

### पत्रकारितेतून विसंगतीवर बोट ठेवले पाहिजे : ॲड. माने

ॲड. धनंजय माने म्हणाले, सोलापूरला जाज्वल्य पत्रकारितेचा इतिहास आहे. मार्शल लॉ च्या काळात कर्मयोगीचे संपादक रामभाऊ राजवाडे यांनी ब्रिटिशांनी केलेल्या अन्यायांचा पाढा आपल्या वृत्तपत्रातून मांडला. यामुळे ब्रिटिशांनी खटला भरला. त्यांना शिक्षा झाली. दरम्यानच्या काळात त्यांच्या प्रेसची इमारत पाडली. त्या जागेवर नवी इमारत उभारली. त्याला विरोध झाला नाही अशी खंत व्यक्त करताना मार्शल लॉ आणि इतर घटनांचा इतिहास पुढे आणला पाहिजे. पत्रकारितेतून विसंगतीवर बोट ठेवले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मतदार संघाच्या सोयीसाठी संपर्क कार्यालय : ना. पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
मतदार संघातील सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी संपर्क कार्यालय उभारण्यात आले असून या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचा माझा प्रामाणिकपणे प्रयत्न असेल असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

ते अहमदपूर येथे राष्ट्रवादी संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. राज्याचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या शुभहस्ते या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख होते. व्यासपीठावर प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, शिवाजीराव काळे, नगराध्यक्ष करीम गुळवे, माजी उपनगराध्यक्ष मुजिब पटेल, एडवोकेट टी एन कांबळे, राम नरवटे, इलियास सय्यद आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ना.पाटील म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकाला न्याय देणे ही आमची भूमिका असून यासाठीच या संपर्क कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. या संपर्कात अत्याधुनिक अशा सुविधा उपलब्ध करण्यात आले असून या सुविधाचा वापर सर्वसामान्य जनतेसाठी करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघात लवकरच विविध समित्या नेमून कार्यकर्त्यांना न्याय देणार आहे. पक्षातील कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी निवडणुकीत अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावली असे ते शेवटी म्हणाले. कार्यक्रमास अहमदपूर, चाकूर तालुक्यातील मान्यवर व विविध पदाधिकारी मान्यवर मंडळी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## डॉ. आंबेडकर लॉयर्स लीगच्यावतीने शाहू महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग, लातूर यांच्यावतीने जिल्हा वकील मंडळाच्या सभागृहात छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच ग्रंथांचे वाटपही करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. बी. व्ही. मोतीपवळे यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष देशपांडे होते. यावेळी जिल्हा वकील मंडळाचे सचिव ॲड. गणेश गोजमगुंडे, सहसचिव ॲड. नीलेश मुचाटे, ग्रंथालय सचिव ॲड. प्रणव रायचूरकर, कोषाध्यक्ष ॲड. गणेश कांबळे, ॲड. उदय गवारे, ॲड. जांबुवंतराव सोनकवडे, ॲड. पांडुरंग ढगे, ॲड. लक्ष्मण शिंदे यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे अन्य पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील वरिष्ठ वकील उपस्थित होते.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाचा निकाल ९३ टक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
मागील वर्षी सुरू झालेल्या एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्षाचा निकाल नुकताच जाहीर झाला. या वर्षीचा निकाल हा तब्बल ९३ % लागला असुन हे विद्यार्थी पुढील वर्षात प्रवेश मिळवण्यास पात्र ठरले आहेत.

या मध्ये ९५ विद्यार्थी विशेष प्राविण्य गटात तर ८२ विद्यार्थी हे प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर,प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बसवराज एरटे, काशिनाथ साखरे, ललिताताई पांढरे आदिंनी अभिनंदन केले आहे.

## व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याची व्यापारी महासंघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
लातूर शहरातील व्यवसाय परवाना ( ट्रेड लायसन्स ) कायमस्वरुप रद्द करण्याची मागणी लातूर व्यापारी महासंघाच्या वतीने एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

व्यापारी महासंघाच्या वतीने आयुक्त मानसी मीना यांना देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, लातूर शहरातील सर्व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधीत्व करण्याचे काम लातूर व्यापारी महासंघाकडून केले जाते. लातुरातील सर्व व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या नूकत्याच पार पडलेल्या बैठकीत व्यवसाय परवानासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीत सर्व व्यापारी संघटनांनी मनपाने व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करावा, अशी आग्रही मागणी लावून धरली. केंद्र व राज्य शासनाने जीएसटी कायदा संमत करताना जीएसटी कराव्यतिरिक्त व्यापाऱ्यांना इतर कोणतेही कर लागू करण्यात येणार नाहीत, असे आश्वासन दिले होते. सध्या व्यापार व उद्योगधंद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. विशेषतः ऑनलाईन ट्रेडिंग व मोठ्य प्रमाणावर मॉल संस्कृतीमुळे लहान, मध्यम व्यापारी, व्यावसायिक अडचणीत सापडला आहे.

त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने लागू करण्यात आलेला व्यवसाय परवाना कायमस्वरुपी रद्द करावा व लातूर शहरातील व्यापार - उद्योग वृध्दीसाठी सहकार्य करण्याची विनंती मनपा आयुक्त सौ. मानसी मीना यांना प्रत्यक्ष भेटून करण्यात आल्याची माहिती लातूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रामदास भोसले, सचिव विशाल अग्रवाल, कोषाध्यक्ष राघवेंद्र ईटकर यांसह महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. महासंघाच्या या मागणीसंदर्भात व्यापारी संघटनांसोबत चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन मनपा आयुक्तांनी दिल्याचे रामदास ( तात्या ) भोसले यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रदीप सोलंकी, विजयकुमार चितकोटे, विनोद गिल्डा, दत्तात्रय पत्रावळे, नागेश स्वामी, अतुल कोटलवार, अरुण सोमाणी, अंकुश भोसले, निसार विंधानी, फारुख शेख, मुस्तफा शेख, राजेश फडकुले, महेश तोंडारे, श्रीराम डागा, अमित ईटकर, पुरुषोत्तम कालिया, विनायक चन्नागिरे, अजय तापडिया, प्रमोद तिवारी, सोनी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नऊ घरफोडीतील अट्टल आरोपीच्या आवळल्या मुसक्या

### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका अट्टल घरफोड्याला अटक करून १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातून नऊ गुन्ह्यांची उकल झाली असून, तपासात आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी लातूर शहरातील वेगवेगळ्या दुकानांचे पत्रे कापून, कडी-कोयंडा तोडून आतमध्ये प्रवेश करून रोख रक्कम, मोबाइल चोरीच्या घटना घडल्या होत्या. याप्रकरणी शिवाजीनगर आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात होते.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेची पथके नेमून गुन्ह्यांचा तपास करण्यात येत होता.

दरम्यान, पथकाने चोरट्यांच्या मोडस ओपरेंडीचा बारकाईने तपास केला असता, यातील आरोपींची माहिती मिळाली. पथकाने शहरातील रेणापूर नाका परिसरातून दिनेश महादेव टेकाळे उर्फ शंकर दत्तात्रय पांचाळ (वय २९, रा. हरिभाऊनगर, कृपासदन रोड, लातूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरलेले मोबाइल तसेच रोख रक्कम, चोरी करण्यासाठी वापरण्यात आलेले हॅन्डग्लोज, पक्कड, कटर, लोखंडी टॉमी असा १ लाख ८० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या आणखी एका पथकाने उदगीर येथील एका गुन्ह्यात चोरलेले दोन मोबाइल हस्तगत केले. यातून घरफोडी व चोरीचे ९ गुन्हे उघडकीस आले असून, आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

## ‘विशाल’चे कार्य इतर संस्थांना प्रेरणादायी : पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
विना सहकार नाही उध्दार या संकल्पेनुसार कार्य करून लातूर विशाल विविध कार्यकारी सेवा सोसायटीची वाटचाल सुरू आहे. सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांना कर्जरुपी आर्थिक मदत करण्यात येते. अनेक सोसायटींची कर्ज वसूली होत नसल्याने त्या तोट्यात जातात. मात्र विशाल सोसायटीने सातत्याने १०० टक्के कर्ज वसूली करून प्रशंसनिय कार्य केलेले आहे. त्यांची ही कार्य तत्परता सहकार क्षेत्रातील इतर संस्थांना प्रेरणादायी असल्याचे मत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नुकतीच माजी नगराध्यक्ष तथा सिध्देश्वर देवस्थान व लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. यावेळी ना. पाटील यांच्या हस्ते लातूर विशाल सेवा सोसायटीचे अध्यक्ष रावसाहेब लकडे, उपाध्यक्ष विष्णू खंदाडे यांच्यासह संचालकांचा सत्कार केला. यावेळी ना. पाटील बोलत होते.



लातूर विशाल विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे कार्यक्षेत्र मोठे असून यामध्ये लातूर शहरासह परिसरातील १३ गावांचा समावेश असल्याने जिल्ह्यातील सर्वात मोठी सोसायटी म्हणून परिचित असल्याचे सांगून ना. पाटील म्हणाले की, गेल्या ४० वर्षापासून या सोसायटीची निवडणूक विक्रम गोजमगुंडे यांच्या नेतृत्वात बिनविरोध होत असल्याचे अधोरेखित केले.

त्यामुळेच ही सोसायटी विक्रम गोजमगुंडे यांच्या नेतृत्वात अतिशय उत्कृष्ट कार्य करीत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांना मोठ्या प्रमाणात कर्ज वाटपही करण्यात येते.

काही सोसायट्या कर्ज वसूली करत नसल्यामुळे त्या तोट्यात जातात. मात्र विशाल सोसायटी प्रतिवर्षी बँक पातळीवर १०० टक्के कर्ज वसूली करत आली आहे. त्यामुळेच या सोसायटीचे कार्य सहकार क्षेत्रातील इतर संस्थांना प्रेरणादायी असल्याचे मत ना. पाटील यांनी व्यक्त केले.

१०० टक्के कर्ज वसूलीबद्दल ना. पाटील यांच्या हस्ते संस्थेचे मार्गदर्शक तथा ज्येष्ठ संचालक विक्रम गोजमगुंडे, चेअरमन रावसाहेब लकडे, व्हा.चेअरमन विष्णू खंदाडे, माजी महापौर तथा संचालक विक्रांत गोजमगुंडे यांचा सत्कार केला.

याप्रसंगी संचालक गोविंद डुरे, राजाभाऊ मोरे, लालासाहेब देशमुख, सत्यनारायण पाटील, दगडू भारती, ॲड. विकास सुळ, दत्तात्रय आर्वीकर, व्यंकटराव रणखांब, भुजंग पाटील, फुलचंद धडे यांच्यासह सोसायटीचे सचिव नरेश बुये, लिपिक शांतेश्वर सोळसे, विक्रम पाटील, पवन पाटील यांच्यासह शहरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## अंगावर कचरा टाकला; तिघांना बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
तालुक्यातील हडोळती येथील एका महिलेने घराच्या अंगणातील कचरा झाडून तो टाकत असताना एकाच्या अंगावर पडला. तेव्हा कचरा माझ्या वडिलांच्या अंगावर का टाकला, असे म्हणत मुलाने चौघांना लोखंडी रॉड व बेल्टने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी दोघांवर अहमदपूर पोलीस ठाण्यात गुरुवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील सुमनबाई गुरुनाथ राजुरे यांनी गुरुवारी सकाळी घरासमोरील अंगणातील कचरा झाडून तो गोळा केला. हा कचरा रस्त्यानजीक टाकत असताना गावातील जावेद करीमसाब शेख यांच्या अंगावर पडला. तेव्हा महिलेने कचरा चुकून पडला असल्याचे सांगून माफी मागितली. तेवढ्यात शेख यांचा मुलगा आयान शेख आला आणि सुमनबाई राजुरे, त्यांचा मुलगा नामदेव राजुरे, पती गुरुनाथ राजुरे व मुलाचा मावस भाऊ सुनील हिवरे यांना शिवीगाळ करीत लोखंडी रॉड व बेल्टने डोक्यात, हातावर, मांडीवर, डोळ्यांवर बेदम मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी नामदेव राजुरे यांच्या फिर्यादीवरून जावेद शेख, आयान शेख या दोघांवर गुरुवारी सायंकाळी अहमदपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## ‘त्या’ प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांना पूर्णवेळ पदभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सात पोलीस अधिकाऱ्यांना त्या -त्या विभागाचा तात्पुरता कारभार सोपविला होता. मात्र, आता सोमय मुंडे यांनी या अधिकाऱ्यांना पूर्णवेळ पदभार सोपविल्याचे आदेश काढले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची नांदेड येथे बदली झाली आहे. त्या ठिकाणचा तात्पुरता पदभार जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांना सोपविला होता. आता बावकर हे स्थानिक गुन्हे शाखेचे पूर्णवेळ अधिकारी बनले आहेत. जिल्हा विशेष शाखेत तात्पुरते प्रभारी असलेले सुधाकर देडे व शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे, आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक अनंत भंडे, उदगीर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, तसेच जळकोट पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक सचिन चव्हाण आणि भादा पोलीस ठाण्याचे तात्पुरते सहायक पोलीस निरीक्षक महावीर जाधव या सात अधिकाऱ्यांना त्याच ठिकाणी पूर्णवेळ नियुक्तीचे आदेश पोलीस अधीक्षक मुंडे यांनी पारीत केले आहेत.

दरम्यान, बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर पदस्थापनेच्या प्रतीक्षेत असलेले पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची लातूर येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाच्या गृह विभागाच्यावतीने काढण्यात आले आहेत.

## भगतसिंग महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
किल्लारी येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयात महाविद्यालयाचा वर्धापन दिन, पदवीप्रदान समारंभ व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

अध्यक्षस्थानी सुधाकर शिंदे होते. मंचावर प्रसिध्द कवी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे, समाज प्रबोधन अकादमीच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. डॉ. कुसुमताई मोरे, माजी परीक्षा नियंत्रक मेजर शांतीनाथ बनसोडे, प्रेमगिर गिरी, प्रा. डॉ. महेश मोटे, बहादूरसाहेब शेख, दत्ता राऊतराव, डॉ. संजय मोरे, डॉ. डी. पी. कांबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संग्राम मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मेजर शांतीनाथ बनसोडे यांनी अभ्यास, साधना व चिंतनाची, ही त्रिसूत्री विद्यार्थ्यांनी अंगीकारावी, असा कानमंत्र दिला. यावेळी सुधाकर शिंदे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी देशभक्तीचे धडे अंगीकारले पाहिजे, असे संबोधित केले.

महाविद्यालयातील कला शाखेच्या ४५ आणि वाणिज्य शाखेच्या ३५ विद्यार्थ्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच किल्लारी व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र व रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, सूत्रसंचालन डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. अशोक गायकवाड यांनी केले. आभार डॉ. संजय मोरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूकंपग्रस्त किल्लारी व परिसरात उच्च शिक्षणाची गुणवत्ता भगतसिंग महाविद्यालयाने कायम ठेवली. या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी महाराष्ट्रभर वेगवेगळ्या शासकीय, निमशासकीय क्षेत्रात सेवा देत आहेत. भगतसिंगाच्या विचाराचा वारसा घेऊन या महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी समाजकारण, राजकारण, अर्थकारण, पोलीस, लष्कर, साहित्य आदी क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करत आहेत. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व गझलकार प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी केले.

## सामान्य माणूसच परिवर्तनवादी चळवळ वाचवेल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
मागील एक दशकापासून भारतात धर्मांध आणि जातीयवादी शक्तीने उच्छाद मांडला असून, प्रतिक्रांतीने डोके वर काढले आहे. बहुजन समाजातील नेते जातीयवाद्यांच्या गळाला लागले असून, बुध्दीजीवी वर्गानेही पलायनवाद स्वीकारला आहे. त्यामुळे जनता भयभीत झाली आहे. फुले-शाहू-आंबेडकरांनी तर भयमुक्त समाजाचे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न साकार करण्यासाठी आता सामान्य माणसेच पुढे येतील. आजच्या अराजकजन्य परिस्थितीत सामान्य माणसेच परिवरिर्तनवादी चळवळ वाचवू शकतील, असा विश्वास सुप्रसिध्द इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. अशोक राणा यांनी व्यक्त केला.



लातूर येथील ‘जी-२४’ या सामाजिक संघटनेच्यावतीने भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ‘शाहू महाराजांची जयंती सणाप्रमाणे साजरी करा :डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रा. राणा बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार धर्मराज हल्लाळे होते.

यावेळी प्रा. राणा म्हणाले, शाहू महाराजांनी सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढली. शिक्षण सर्वांना मोफत आणि सक्तीचे केले. त्यामुळे बहुजन समाज शिकून पुढे आला. परंतु, आजही जातीवादाने आपली पाठ सोडली नाही. जातीव्यवस्थेने लादलेली गुलामी बहुजन समाजाला अलंकार वाटू लागली असून, ही गुलामी झुगारण्याऐवजी गुलामीतच ते आनंद मानत असल्याने जातीव्यवस्था टिकून आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे जाती नष्ट करून प्रवर्ग निर्माण केले. पण जातीयवाद्यांना जाती अबाधित ठेवायच्या असल्याने त्यांनी संविधानाला विरोध चालविला आहे. भारतात पुन्हा एकदा मनुस्मृती आणून बहुजन समाजाला गुलाम करण्याचे षढयंत्र रचले जात आहे. आज संविधान धोक्यात आले असताना ते वाचविण्यासाठी नेते पुढे येत नाहीत हेच मोठे आव्हान आजच्या परिवर्तनवादी चळवळीसमोर असल्याने आता सामान्य माणसेच चळवळीचा रथ पुढे नेतील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रा. शैलेजा बरूरे, प्रा. डॉ. मारोती गायकवाड, अफजल कुरेशी आणि रामराजे आत्राम यांचीही समायोचित भाषणे झाली. नरसिंग घोडके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सुधीर अनवले यांनी प्रास्ताविक केले. अपर्णा ढावारे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. गणेश गोमारे यांनी आभार मानले.

यशस्वीतेसाठी ‘जी-२४’ संघटनेचे इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा. सुभाष भिंगे, शिवाजी शिंदे, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, प्राचार्य आर. डी. निटूरकर, प्रा. डॉ. अशोक नारनवरे, प्रा. सुशिला पिंपळे, माधव बावगे, शिरीष दिवेकर, नारायण कांबळे, यु. डी. गायकवाड, ॲड. वसंत उगले, रामकुमार होळीकर, प्रा. वैभव सरवदे, डी. उमाकांत, ॲड. किरण कांबळे, विवेक गायकवाड आदींनी पुढाकार घेतला.

## आमदार रमेश कराड यांच्या हस्ते विकासकामांचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जून -**
लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा सर्कलमधील सत्तरधरवाडी येथे सव्वाचार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा लोकार्पण आणि उद्घाटन सोहळा भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, तहसीलदार घनश्याम अडसूळ, पंचायत समितीचे राऊत, भाजप मंडळ अध्यक्ष उध्दव काळे, सतीश अंबेकर, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, शरद दरेकर, राजकिरण साठे, रवींद्र पाटील, बालाजी साळुंखे, सरपंच आडे, उपसरपंच श्रीनाथ बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी आमदार कराड यांचे फटाक्यांची आतिषबाजी करत ग्रामस्थांनी स्वागत केले. यावेळी सिमेंट रस्ता, बंदिस्त नाली, सभागृह, आरो पाणी प्लँट, दलित वस्ती, तांडा वस्ती सुधार कामे, जनसुविधा पेव्हर ब्लॉक रस्ता, मातोश्री पाणंद रस्ता, सेवादास विद्युतीकरण, वडार वस्ती सिमेंट रस्ता, दलित वस्ती सिमेंट रस्ता, बोअरवेल, शाळा रंगरंगोटी या विकासकामांचे लोकार्पण आणि जलजिवन मिशन अंतर्गत पाणी टाकी, विहीर आणि पाइपलाइन कामाचे उद्घाटन तसेच ३४५ गरजू लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले.

गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून ग्रामीण मतदारसंघात काम केले, संघर्ष केला. सर्वसामान्यांनी साथ दिली म्हणूनच प्रस्थापितांची सत्ता उलथून नवा इतिहास घडला. आपल्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. जनतेचे प्रश्न सोडविणे हे माझे कर्तव्य आहे. ग्रामीण भागातील गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची प्राधान्याने सोडवणूक झाली पाहिजे. याबाबतीत कोणी अडवणूक, हयगय अथवा दिरंगाई केली तर सबंधित अधिकाऱ्याची गय करणार नाही, असा इशारा आमदार कराड यांनी दिला. यावेळी पवन अंधारे, शिवराज पाटील, धनराज कवठे, शिवप्रसाद पाटील, सुनील पवार, भीमराव चव्हाण, वसंत राठोड, विक्रम बंडगर, भगवान राठोड, महेश कांबळे, बालाजी बंडगर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कालिदासाचे मेघदूत : भारतीय संस्कृतीचा लेखाजोगा
### 'साहित्य भारती' च्या कार्यक्रमात डा. निलंगेकर यांचे मत



छत्रपती संभाजीनगर : महाकवी कालिदासाची मेघदूत रचना म्हणजे भारतीय संस्कृती, विज्ञानापर्यंतचा लेखाजोगा , ठेवा आहे असे मत संस्कृत लेखक डा. अजय निलंगेकर यांनी व्यक्त केले. 'साहित्य भारती' च्या वतीने शनिवारी (दि. २८) आयोजित कालिदास दिन कार्यक्रमात ते बोलत होते. नारायणराव उजळंबकर वाचनालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स.भु. विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय गायकवाड होते. व्यासपीठावर प्रा. डा. वि. ल. धारुरकर, साहित्य भारतीचे प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे यांची उपस्थिती होती.

आपल्या संस्कृतीला धक्का न लावता कालिदासाने लेखन केल्याचे सांगत निलंगेकर म्हणाले की, मेघदुतात रामगिरी पर्वतापासून ते हिमालयापर्यंत वर्णन आहे. हे वर्णन आजच्या काळातही तंतोतंत लागू पडते. भूगोल,इतिहास,धर्म,तत्कालिन समाजजीवन याचा उलगडा काव्यातून होतो. या काव्यात मेघाच्या साठ रुपांचे वर्णन असून लेखनशैली, अर्थ सर्वांना समजण्यासारखा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. धारुरकर यांनी कालिदासाच्या प्रतिभेचा आढावा घेत काव्य सादर केले. साहित्य भारतीच्या वतीने राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती प्रास्ताविकात काळे यांनी दिली. सूत्रसंचालन डा. नागेश अंकुश यांनी तर आभार विलास फुटाणे यांनी मानले. यावेळी प्रा. अंकुश यांच्या 'अक्षरमात्र तितुकें नीट' या पुस्तकाची कर्नाटकातील राणी चन्नमा विद्यापीठ अभ्यासक्रमात निवड झाल्याबद्दल, त्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपाली कुलकर्णी, संगीता धारुरकर, योगीता देवागिरीकर, शेषराव पठाडे, अनघा देवगिरीकर, विजय जोग, विनायक पवार, ग्रंथालयाचे कर्मचारी उदय सुरंगळीकर आदींनी प्रयत्न केले.

## फर्दापूर येथे मोबाईल कंपनीचे टॉवर बनले शोभेची वस्तू

फर्दापूर दि २९- फर्दापूर येथे जिओ रिलायन्स कंपनी यांचे टॉवर असुन नेटवर्क राहत नाही फर्दापूर येथे मोठ्या प्रमाणात देशी विदेशी पर्यटक येतात त्यामुळे आता आर्थिक व्यवहार हा ऑनलाइन पद्धतीने पर्यटक करतात परंतु येथे जिओ रिलायन्स कंपनी यांचे ना नेटवर्क राहत ना फोन वर व्यवस्थित कॉल होत नाही दोन चार दिवस झाले की फोर जी चालत ना फायू जी चालत नाही यामुळे पर्यटक तसेच गावातील नागरिक व अभ्यासू विद्यार्थी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे काही विद्यार्थी ऑनलाइन अभ्यास करतात परंतु या कंपनीचे नेटवर्क व्यवस्थित चालत नसल्याने मोठ्या अडचणी येत आहेत तरी जिओ रिलायन्स कंपनी यांचे छत्रपती संभाजीनगर येथील एरिया मॅनेजर यांनी तात्काळ लक्ष देऊन फोर जी फायू जी यांचे नेटवर्क व्यवस्थित करून येणाऱ्या देशी विदेशी पर्यटक यांना अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी

## जिल्ह्यातील उत्पादित मालाची निर्यात क्षमता वाढवण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा तयार करा- जिल्हाधिकारी

अहिल्यानगर- जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या साखर, दुग्धजन्य व अन्य मालाची निर्यात क्षमता वाढवण्यासाठी निर्यातदारांना प्रशिक्षित करत सर्वंकष कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी घेतला.

या बैठकीस महाव्यवस्थापक दीपक शिवदास, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, उद्योग अधिकारी अशोक बेनके, श्याम बिराजदार, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चरचे प्रकाश गांधी, जागतिक बँक प्रकल्पाचे उप कार्यकारी अभियंता अभय भांगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे, उत्पादन शुल्क विभागाचे प्रवीणकुमार तेली, महाराष्ट्र मेकॅनिकल इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, आमी संघटनेचे अध्यक्ष श्री. खाकाळ यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. पंकज आशिया म्हणाले, 'एक जिल्हा, एक उत्पादन' या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील साखर व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादनांची क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. जिल्ह्यात कार्यरत असलेल्या अनेक फार्मर प्रोड्यूसर कंपन्यांना विदेश व्यापार महानिदेशालयामार्फत प्रशिक्षित करण्यात यावे. निर्यातीतील अडचणी सोडवण्यासाठी निर्यात मदत केंद्र उभारण्याचेही त्यांनी सूचित केले.

प्रशासन व उद्योजकांच्या समन्वयातून निर्यात क्षमतेस चालना देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची कामे, अनधिकृत स्टॉल हटवणे, पोलीस गस्त वाढवणे, अखंड व पुरेसा विद्युत पुरवठा, सनफार्मा ते निंबळक रस्त्याचे काम, ड्रेनेज स्वच्छता, कामगारांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आरोग्य सेवा, ई-बस सुविधा, नवीन सबस्टेशनची उभारणी, स्ट्रीट लाईट्स, भूखंड वाटप, निवासी क्षेत्र विकास, अग्निशमन यंत्रणा, राष्ट्रीयीकृत बँकेची उभारणी आदी विविध विषयांचाही आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

## नगर शहरातील ओपन स्पेस विकास व देखभालीसाठी धोरण निश्चित करा - महापालिका आयुक्तांकडे मागणी

नगर : शहरात महानगरपालिकेच्या मालकीचे असंख्य ओपनस्पेस आहेत. यापैकी अनेक ओपनस्पेसवर महानगरपालिकेने लाखो रुपये खर्च करून वॉकिंग ट्रॅक, खेळण्या, सुशोभीकरण आदी सुविधा निर्माण केलेल्या आहेत. मात्र या सुविधांचा जबाबदारीने वापर होत नसल्याने अनेक ओपनस्पेसची दुरावस्था झालेली दिसत आहे. त्यामुळे महापालिका हद्दीतील ओपनस्पेसचा विकास व देखभालीसाठी धोरण निश्चित करण्यात यावे, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे ओपनस्पेस विकसित करताना त्या ओपनस्पेसच्या कॉलनीतील बागकामाची आवड असणाऱ्या निसर्गप्रेमी रहिवाशांची संबंधित प्रभाग अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ओपनस्पेस विकास व देखभाल समिती तयार करण्यात यावी. अशा प्रकारची ओपनस्पेस विकास व देखभाल समितीची निर्मिती झाल्यास लाखो रुपये खर्च करून विकसित केलेले ओपन स्पेस व त्यामधील सुविधा सुस्थितीत व सुरक्षित राहतील त्यांची दुरावस्था होणार नाही. त्यामुळे याबाबतचे धोरण निश्चित करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत शहराचे आमदार संग्रामभैय्या जगताप यांनाही देण्यात आलेली आहे.

## आणीबाणीमध्ये कारावास भोगलेल्या संघर्षयात्रींचा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते गौरव

अहिल्यानगर- देशात आणीबाणी लागू झालेल्या घटनेस ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने आणीबाणीत कारावास भोगलेल्या जिल्ह्यातील संघर्षयात्रींचा निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात एका विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे गौरवपत्र, गुलाबपुष्प देवून गौरव करण्यात आला. यावेळी तहसीलदार (सामान्य प्रशासन) शरद घोरपडे, तहसीलदार श्री.सबनीस, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, माहिती अधिकारी अमोल महाजन, विजय जोशी, विजय वहाडणे, राजाभाऊ मुळे आदी उपस्थित होते. यावेळी विजय जोशी, विजय वहाडणे व राजाभाऊ मुळे यांनी मनोगत व्यक्त केले. आणीबाणी विरोधात लढा देणाऱ्या संघर्षयात्रींचा शासनाने सन्मान करुन कृतज्ञता व्यक्त केल्याबाबत त्यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले.

# शेतकऱ्यांना युरिया व खत तातडीने उपलब्ध करून द्या आ. अब्दुल सत्तार

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२९, शेतकऱ्यांना युरिया व इतर खत तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करा. पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करा, विकास कामांना गती देवून विकास कामे निर्धारित वेळेत पूर्ण करा अशा सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी शासकीय यंत्रणेला दिल्या.

सिल्लोड तहसील कार्यालयात मतदारसंघातील खरीप पीक परिस्थिती, खते औषधी उपलब्धतेबाबत तसेच विकास कामांबाबत आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी वरील निर्देश दिले.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण,



तहसीलदार सतीश सोनी ( सिल्लोड ), तहसीलदार मनीषा मेने ( सोयगाव ), उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव , सिल्लोड न.प. चे मुख्याधिकारी तथा प्रशासक कारभारी दिवेकर, जलसंधारण विभागाचे उपविभागीय अभियंता राजधर दांडगे, तालुका कृषी अधिकारी प्रमोद डापके, तालुका कृषी सेवा केंद्राचे अध्यक्ष नरेंद्र ( बापू ) पाटील, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, विविध बँकेचे व्यवस्थापक, खत, बियाणे विक्रेत्यांची उपस्थिती होती. पीक कर्जाचे उद्दिष्ट निम्म्यापेक्षा कमी झाल्याचे पाहून आमदार अब्दुल सत्तार यांनी बँक व्यवस्थापकांना चांगलेच धारेवर धरत खडेबोल सुनावले. पीक कर्जासाठी बांकांकडून शेतकऱ्यांची होणारी अडवणूक पिळवणूक खपून घेणार नाही असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले. पीक कर्जाची मागणी करणारा एकही पात्र शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या तसेच येत्या ७ दिवसांत पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा असे निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी बँक अधिकाऱ्यांना दिले.

युरिया खताचा होणारा तुटवडा पाहता यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याशी भ्रमनध्वनीवर संवाद साधला. सिल्लोड - सोयगाव तालुक्यात यंदा मका पिकाचे लागवड क्षेत्र वाढल्याने युरीया खताची मागणी वाढली. त्यामुळे मागणीनुसार शेतकऱ्यांना तातडीने युरिया खताची उपलब्धता करून द्यावी असे आमदार अब्दुल सत्तार विभागीय आयुक्तांना म्हणाले.

## श्री स्वामी समर्थ पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न
### सभासदांच्या सहकार्यामुळे पतसंस्थेचे मोठे योगदान - चेअरमन राजेश गिरी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ जून - श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्यादित आमखेडा ता.सोयगाव यांची २२ वार्षिक सर्वसाधारण सभा हॉटेल अमृत इन गार्डन जरंडी येथे शनिवार वार रोजी १०:३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

श्री स्वामी समर्थ प्रतिमेस हार अर्पण व दीप प्रज्वलन पूजन पतसंस्थेचे संचालक एस.टी. पाटील,डॉ.रघुनाथ फुसे,राहुल गिरी यांच्या हस्ते करून सभेला सुरवात करण्यात आली.यावेळी संस्थेचे अध्यक्ष ड.राजेश (भैय्या)गिरी यांच्या अध्यक्षतेखाली मिटींगला सुरुवात करण्यात आली.संस्थेच्या संपूर्ण लेखाजोखा संस्थेचे संचालक सतीश कोलते यांनी मांडला व

संस्थेने विविध क्षेत्रात निधी



उपलब्ध करून महत्त्वाचे योगदान सोयगाव तालुक्यात दिले.तसेच यावेळी सोयगाव शहरातील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त उद्योजक इंग्रजित सिंह खस व कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी,यांचा पतसंस्थेच्या वतीने फुलगुच्छ व शाल देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष ड राजेश(भैय्या) गिरी,उपाध्यक्ष विष्णू दुसाने,आकाश वरकड,बाबु पटेल,एस.टी.पाटील,कंदिर शहा,युवराज आगे,अर्जुन बोडखे,अमोल निकम,मिराबाई कोलते,सिंधुबाई इंगळे,मंगलाबाई निकम,राहुल गोसावी,व आमखेडा माजी सरपंच गजानन ढगे,कै बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन योगेश बोखारे,रवींद्र पाटील,ड.सचिन गिरी,योगेश वामने,माजी सरपंच सुरेखाताई तायडे,भैरवनाथ पतसंस्थेचे मॅनेजर धनराज औरंगे,तिरुपती पतसंस्थेचे मॅनेजर विकास देसाई,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे मॅनेजर सीताराम गोतमारे,सुनिल निकम,रमेश वामने,विशाल घन,संदिप सोहनी,कृष्णा शेवाळकर,दिलीप लाठे,गजू दुतोंडे,योगेश काळे,गोकूळ रोकडे,कडूबा ठाकरे,रवींद्र साखळे,रवींद्र घन,अशा विविध क्षेत्रातील व गावातील मान्यवर उपस्थित होते.सभा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर पाटील,कॅशियर सुनिल सैंदाणे,देवा बैरागी,गणेश पवार,यांनी परिश्रम घेतले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश कोलते यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर पाटील यांनी मानले

## परळी न.पच्या अंतर्गत झालेल्या कामांची इ.स.२०१६ ते २५ वर्षातील श्वेतपत्रिका त्वरित जाहीर करा-बहादुरभाई
### शहरातील नदीवरील अतिक्रमण हटवासह विविध प्रश्नांवर परळी काँग्रेसचे निवेदन

#### न.प.प्रशासनाला काँग्रेसचने दिले १५ दिवसाचे अल्टिमेटम

परळी प्रतिनिधी - झोपेचे सोंग घेऊन परळी नगर परिषद प्रशासन मुग गिळून करोडो रुपयांचा अफरातफर करत गिळंक्रत करत आहे याचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाच्या वतिने वारंवार श्वेतपत्रिका काढावी म्हणून निवेदने, आंदोलने केले परंतु अद्यापही श्वेतपत्रिका काढु शकली नाही यामुळे भ्रष्टाचाराचा संशय अधिक बळावला आहे.याच निवेदनाची पुन्हा आठवण म्हणून काँग्रेसच्या वतीने परळी नगर परिषदेला देण्यात आले असल्याचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी नगर परिषदेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, न.प.प्रशासनाने २०१६ से २०२४ पर्यतची श्वेतपत्रिका आठ



दिवसात प्रसिद्ध करावी, मागील दोन तीन वर्षा पासून आमच्या काँग्रेस पक्षा मार्फत अनेक निवेदन आपणास देण्यात आली जसे की, दुबार टेंडर ची चौकशी, झालेले कामाचे निवेदा काढून कोट्यावधी चे भ्रष्टचार बाबत चौकशी, कामाची गुणवत्ता बाबत, श्वेत पत्रिका प्रसिद्ध करणे बाबत, मनमानी कर मागे घेण्या बाबत, रोड, रास्ते, नाल्या, स्वच्छता, घरकूल, बाबत अनेक निवेदन देऊन सुद्धा एक ही कार्यवाही आपले कार्यालय मार्फत आज पर्यत पर्यंत केली नाही, किंवा त्या बाबत काही कारवाई दिसून येत नाही. डिसेंबर २०१६ ते मार्च २०२५ पर्यंतहची श्वेतपत्रिका दि.५ जुन २०२५ पूर्वीची प्रसिद्ध करावी, पक्षाचे अनेक निवेदन आपल्या कार्यालयात पडून आहे त्यावर कार्यवाही करावी अन्यथा आपण भ्रष्टचाराचे पाठराखण करीत असल्याने आपल्या भूमिकेचे परळी शहर काँग्रेस च्या वतीने दि.दि.५ जुन २०२५ नंतर तिव्र आंदोलन आपल्या कार्यलय समोर करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.तसेच परळी शहरातील सरस्वती नदीवरील, अतिक्रमण तत्काळ हटवणे, मुस्लिम कबरस्थान जवळील आपण केलेले नाला चे नालीत रूपांतर पुन नाल्यात करणे, शादी खाना ते सरस्वती नदी दरम्यान असलेली घाण तत्काळ काढणे व शादीखाना परिसरातील अतिक्रमण ताबडतोब हटवणे अदी बाबत निवेदन देण्यात आले याच बरोबर आहे.न.प.प्रशासनाला काँग्रेसने १५ दिवसाचे अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर शशी चौधरी,इतेशाम खातिब,वैजनाथ गडेकर,दीपक सिरसाट,रुसुल खान, बद्दर भाई, गफारशा, गित्ते इत्यादीच्या स्वाक्षरी आहेत.

# जैन मुनि देख लो, त्याग करना सिख लो
### उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांचे देशमुखनगर येथे चातुर्मास साठी आगमन

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - प.पु.आचार्य समाधीसम्राट विरागसारजी महाराज यांचे प्रभावक शिष्य प.पु.पटटाचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचे आज्ञानुवर्ती शिष्य प.पु.उपाध्याय १०८ विरंजनसागरजी महाराज, मुनिश्री विनीशोधसागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यसागरजी महाराज, प.पु.क्षुल्लिका विशिलाश्री माताजी यांचा ससंघाचे आज सकाळी आगमन झाले.

चातुर्मास श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुखनगर,शिवाजीनगर येथे आगमन झाले . उपाध्याय विरंजनसागरजी महाराज ससंघाचे आज सकाळी ८ वाजता राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज चौक सेव्हनहिल जालना रोड येथे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी समाज बांधवांनी जैन मुनि देख लो, त्याग करना सिख लो, गुरूजी हमारे आये है, नई रोशनी लाये है, जिओ और जिने दो



असा जयघोष करत संपुर्ण परिसर धर्ममय झाला होता. यावेळी सकल जैन समाजातील समाज बांधव उपस्थित होते .

यावेळी महिलांनी केशरी रंगाच्या व चुदडीच्या साडया परिधान केल्या होत्या तर पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. महिलांनी डोक्यावर कुंभ कलश घेवुन पुढे चालत होत्या. तसेच जैन ध्वज घेवुन भाविक पुढे चालत होते. शोभायात्रेत रथ आकर्षिक करत होता. यामध्ये देवशास्त्र गुरू भगवान मल्लीनाथांचा फोटो शास्त्र व आचार्य समाधीसम्राट विरागसारजी महाराज व आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचा भव्य असा फोटो लावण्यात आला होता. उपाध्याय संघाचे सेव्हन हिल, गारखेडा मार्गे देशमुखनगर जैन मंदिरात आगमन झाले यावेळी उपाध्याय महाराज ससघ यांच्या सानिध्यात भगवान मल्लीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी शांतीमंत्राचे पठण महाराजजी ने केले. यावेळी सभामंडपाचे उदघाटन संजय फत्तेचंद कासलीवाल परिवाराच्या वतीने करण्यात आले. यावेळी उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले की देशमुखनगर समाज बांधवांचा पुण्यकर्माचा उदय असल्यामुळे मी ६७० कि.मी.पदयात्रा करैन इथपर्यत आलो आहे. चातुर्मासामध्ये धर्म, संयम, व साधना करैन पुण्य मिळवावे असेही सांगीतले. यावेळी पादपक्षालन मंडपामध्ये गुरू परिवाराच्या वतीने करण्यात आले. सेव्हन हिल येथे सकल जैन समाजाच्या वतीने पाद पक्षालन करण्यात आले. यावेळी देशमुखनगर येथील महिलांनी व नवयुवतींनी सुदंर असे धार्मिक नृत्य सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. यावेळी ५१ थाळी ठेवुन केशर व दुधाने महाराजांचे पाद पक्षालन करण्यात आले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुखनगर शिवाजीनगर व सकल जैन समाजाच्या बांधवांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती शाहू महाराज म्हणजे जनकल्याणाचा ध्यास असलेला राजा : डॉ.कसाब




पैठण दि २८ :- छत्रपती शाहू महाराजांनी राजेशाही घराण्यातलं आरामी जीवन नाकारून बहूजनांच्या, अस्पृश्यांच्या जनकल्याणासाठी अहोरात्र प्रयत्न केले. आयुष्यभर सत्यशोधक विचारधारा अंगीकरून स्त्रीयांचे शिक्षण, अस्पृश्यता निर्मुलन, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आयुष्य खर्च केले. खर्याअर्थाने ते जनकल्याणाचा ध्यास असलेला राजा होता!' असे मत डॉ.डी.आर.कसाब यांनी व्यक्त केले. ते येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात संपन्न शाहू महाराज जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे हे होते. त्यांनी शाहू महाराज जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. वैजनाथ चाटे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. रमाकांत तिडके यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचं संचलन डॉ.अर्जुन मोरे यांनी तर आभार डॉ. हंसराज जाधव यांनी मानले.

## रतनकुमार साळवे राजर्षी छत्रपती, शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



छत्रपती संभाजीनगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन परिसरात दिनांक २६ जून २०२५ रोजी पार पडलेल्या समारंभात पत्रकार रतनकुमार साळवे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक समतेचे आणि बहुजन कल्याणाचे प्रतीक असलेल्या शाहू महाराजांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार स्वीकारताना पत्रकार रतनकुमार साळवे भावुक झाले. शाहू महाराजांच्या जयंतीदिनी मिळालेला हा सन्मान आयुष्यातील एक विशेष ठेवा असल्याचे त्यांनी सांगितले. हा पुरस्कार केवळ गौरव नव्हे, तर सामाजिक समतेसाठी आणि विचारप्रधान पत्रकारितेसाठी अधिक जबाबदारीने काम करण्याची नवी प्रेरणा आहे, असे पत्रकार रतनकुमार साळवे म्हणाले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान पहिले आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. समाधान दहिवळ यांनी भूषवले. तर उद्घाटक प्रा. डॉ.ऋषिकेश कांबळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय माजी मंत्री जयसिंगराव गायकवाड, प्रा. गजानन प्रधान, डॉ. चंद्रसेन कोठावले, किशन वराडे, डॉ.उमाकांत राठोड, डॉ.विजया गेडाम, पँथर,अनिलकुमार बस्ते, सुनील वाकेकर यांची उपस्थिती होती.

## एमजीएम विद्यापीठात कालिदास जयंती साजरी



छत्रपती संभाजीनगर, दि.२९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेस संस्थेत संस्कृत विभागातर्फे कालिदास जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने कालिदास साहित्य संपदा याविषयी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यात संस्थेतील मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी विभागांतील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यावेळी आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक के.पी.सिंग, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्कृत विभागातील प्रा.डॉ.प्रज्ञा कोनार्डे यांनी केले. कार्यक्रमास मराठी विभागातील प्रा.डॉ. राम गायकवाड, प्रा.डॉ.मारोती गायकवाड, हिंदी विभागातील प्रा.डॉ. शहानाज बासमेह, प्रा.डॉ.सुरेखा लक्कस, उर्दू विभातील प्रा.डॉ.अस्वद गोव्हर, प्रा.डॉ. साजिद आलम तसेच इंग्रजी विभागातील प्रा.डॉ.रेहाना सय्यद, प्रा.डॉ.सुप्रिया सांगवीकर, प्रा.डॉ.वैशाली माडजे, प्रा.डॉ.इम्रान पठाण, स्त्री अध्यासनच्या प्रा.डॉ. मंजूश्री लांडगे, शिक्षणशास्त्र विभागातील प्रा.डॉ.अमरदीप असोलकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौरभ वांढरे, विशाल अहिरे यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृत विभागातील संशोधक स्वाती पुराणिक यांनी तर आभार एमए मराठीच्या पवन शेळके याने मानले.

## पेन्शनधारक घालणार विठूरायांना साकडे प्रतिपंढरपुरात आशीर्वादासाठी पायी वारी

छत्रपती संभाजीनगर : पेन्शनमध्ये सन्मानजनक वाढ करावी, या आग्रही मागणीसाठी अनेक वर्षांपासून ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समिती लढा देत आहे. या लढ्याला यश मिळून पेन्शनमध्ये वाढ व्हावी यासाठी पेन्शनधारक समितीच्या वतीने ६ जुलै रोजी छोट्या पंढरपुरात पायी वारी करून विठुरायांना साकडे घालण्यात येणार आहे.

पेन्शनमध्ये वाढ होऊ दे, असे विठुरायांना साकडे घालण्यासाठी ६ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमत्ति पंढरपूर, वाळूज येथे 'वठ्ठिल वठ्ठिल...' म्हणत पायी वारी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील सर्व ईपीएस-९५ पेन्शनधारकांनी ज्यांची पाई वारी करण्याची तयारी असेल, अशा पेन्शनधारकांनी आपापली नावे संघटनेचे संपर्कप्रमुख अरुण कुलकर्णी यांच्याकडे ४ जुलैपर्यंत कळवावीत. ६ जुलै रोजी सकाळी ७ वाजता बाबा पेट्रोल पंप येथून ही वारी निघणार आहे, याची नोंद घ्यावी तसेच जे या वारीत सहभागी होणार आहेत त्यांनी सोबत टाळ आणावेत, असे आवाहन समितीचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष कमलाकर पांगारकर यांनी केले आहे.

मांजरा शिक्षण संस्था नायगाव ता केज जी बीड द्वारे संचलित

संत ज्ञानेश्वर विद्यालय नायगाव ता केज जी बीड (अनुदानित)

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदाचे नाव | शै. पात्रता | विषय | पद सख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक (इ. ९/१० साठी ) | बी.एस्सी. बी.एड् | गणित | १ | मानधन तत्वावर |
| २ | शिक्षण सेवक (इ. ६ ते १० साठी ) | बी.ए. बी.एड् | इंग्रजी मराठी | २ | मानधन तत्वावर |
| ३ | क.लिपिक | पदवीधर MS-CIT | -- | १ | मानधन तत्वावर |

टिप -

१. सदरील पदे हे तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर फक्त दहा महिन्यासाठी भरण्यात येणार असून उमेदवाराची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाणार आहे.

२. सदरील पदे हे संस्थेमार्फत भरले जात असून यास कुठलेही शासकीय अनुदान असणार नाही

३. नियुक्त उमेदवारास सध्याच्या किंवा भविष्यातील शाळेतील शिक्षक/शिक्षेकेतरच्या रिक्त पदावर हक्क सांगता येणार नाही.

४. इच्छुक उमेदवारांनी दिनांक १३/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता संत ज्ञानेश्वर विद्यालय नायगाव ता केज येथे कागदपत्रासह मुलाखतीस हजर रहावे.

सचिव
मांजरा शिक्षण संस्था नायगाव
ता केज जी बीड
मो.नं. ८३२९४८८५६९
(कळंब अंबेजोगाई रोडवर धनेगाव फाट्यावर उतरून नायगाव कडे यावे लागते)

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# नवी दिशा, नव्या वाटा, नवी वळणे...

वीस-पंचवीस वर्षांपूर्वी, मुंबईच्या चर्चगेट स्टेशनमधून बाहेर पडून मंत्रालयाच्या दिशेने चालायला सुरुवात केली की समोरचा रस्ता अनेकदा पोलिसांच्या बॅरिकेड्सनी बंद झालेला दिसायचा. चर्चगेटचे सम्राट हॉटेल हे नाव त्या वेळी उभ्या महाराष्ट्राला वर्तमानपत्रांतून दिवसाआड एकदा तरी वाचायला मिळायचं. कारण या पोलिसी बॅरिकेड्सचं आणि सम्राट हॉटेलचं त्या वेळी खूपच जवळचं नातं होतं. शेजारच्या फूटपाथवरून वाट काढत मंत्रालयाच्या दिशेनं चालायला सुरुवात केली की उभा महाराष्ट्र त्या रस्त्यावर उतरलाय, असं चित्र दिसायचं. छातीवर बिल्ले लावलेले आणि हातात पक्ष, संघटनांचे झेंडे घेतलेली असंख्य माणसं गर्दी करून त्या बॅरिकेड्सनी बंद केलेल्या रस्त्याच्या चौकोनी तुकड्यात खच्चून जमलेली असायची आणि दुसऱ्या टोकाला तात्पुरत्या उभ्या केलेल्या एका स्टेजवर कुणीतरी नेता, जिवाच्या आकांतानं भाषण करताना दिसायचा. गर्दीचं त्याच्या बोलण्याकडे फारसं लक्ष नसायचं. मोर्चाच्या निमित्तानं मुंबईत आलेली ती गर्दी, जमेल तेवढी जिवाची मुंबई करून घेण्यासाठी धडपडताना दिसायची. गर्दी विस्कळीत होतेय, असं वाटायला लागलं की, स्टेजवरचा नेता भाषण थांबवून, डाव्या हाताची मूठ गच्च वळून, हात उंचावत जोरदार घोषणा द्यायचा... कोण म्हणतो देणार नाही? मग, विस्कटलेली गर्दी लगेच भानावर यायची. बसल्या जागी किंवा जिथे असेल तिथे थांबून, प्रत्येकाचा हात मूठ वळून हवेत उंच व्हायचा आणि नेत्याच्या घोषणेला जोरदार प्रतिसाद म्हणून, घेतल्याशिवाय ऱ्हाणार नाही असा नारा गर्दीत घुमायचा.

चर्चगेटसमोरचं हे दृश्य आज तिथून अदृश्य झालं आहे. एकेकाळी समोरच्या रस्त्यावर जमणारी हजारो अनोळखी चेहऱ्यांची गर्दी हरवली आहे. कारण, मंत्रालयावरील मोर्चासाठी कधीकाळी हक्काची असलेली ही जागा आता फक्त रहदारीसाठी खुली आहे... हक्काचे मोर्चे आता मंत्रालयापासून लांब, आझाद मैदानावरच्या एका कोपऱ्यात गोळा होतात... तिथे जिवाच्या आकांतानं, कितीही मोठ्या आवाजात घोषणा दिल्या, तरी रस्त्यावरच्या वाहत्या गर्दीच्या कोलाहलात, घोषणांचा तो आवाज बाहेरदेखील पोहोचत नाही. मंत्रालय तर तिथून आणखीनच दूर राहिले. हक्कासाठी, न्यायासाठी निघणाऱ्या त्या मोर्चांची संख्यादेखील अलिकडे रोडावत चालली आहे. मंत्रालयावर आलेला आझाद मैदानावरचा मोर्चा आजकाल मुंबईला जाणवतदेखील नाही. पण, जनतेच्या हक्कांची जाणीव जागी राहावी आणि त्या नावाखाली आपले नेतृत्वही जिवंत रहावे, म्हणून मोर्चे निघतातच. त्यापैकी दोन-चारजण मंत्रालयात कुणा मंत्र्याची नाहीतर संबंधित अधिकाऱ्याची भेट घेतो, मागणीचं एखादं निवेदन सरकारला सादर करतो आणि विचार करण्याचे आश्वासन सरकारकडून मिळविल्यावर मोर्चा विसर्जित होतो. घेतल्याशिवाय ऱ्हाणार नाही, ही घोषणा देत पुन्हा सगळे मोर्चेकरी आपापल्या गावी परततात. हक्काचा लढा त्या दिवशीपुरता संपलेला असतो.

स्वतंत्र देशाचा नागरिक म्हणून असे असंख्य हक्क घटनेने आपल्याला बहाल केलेले असतात आणि त्यापासून असंख्य लोक वंचितही राहिलेले असतात. असे काही हक्क आपल्याला मिळालेलेच आहेत आणि ते बजावणे हाही आपला हक्क आहे, याची त्यांना जाणीवदेखील नसते. म्हणूनच, स्वातंत्र्यानंतर सात दशके उलटून गेली तरी अनेकांना आपल्याला लोकशाहीने बहाल केलेल्या हक्कांचीदेखील ओळख नसते. मतदान हा आपला हक्क आहे आणि ते कोणाकरिता करावयाचे हे ठरविणे हादेखील हक्क आहे, हेदेखील अनेकांना माहीत नसते. म्हणूनच, लोकशाहीचा सर्वोच्च आधारस्तंभ उभारताना, मतदान विकत घेण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. अनेक जण गरजेपोटी आणि अज्ञानापोटी हा हक्क विकतानाही दिसतात. तरीदेखील, या गोष्टीला घटनेच्या दृष्टीने हक्क असेच म्हटले जाते. अशा हक्कांच्या लांबलचक यादीत सुमारे दीड दशकापूर्वी, शिक्षणाचा हक्क नावाच्या एका हक्काची भर पडली.

जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाला शिक्षण मिळालेच पाहिजे, असे बजावणारा नवा कायदा देशात अंमलात आला. त्यामुळे, पुढच्या पिढीतील प्रत्येकाला ताठ मानेने शाळेची पायरी चढता येईल, अशी हमी या कायद्याने त्याला दिली. शिक्षण हा प्रत्येक बालकाचा संवैधानिक हक्क झाला. शैक्षणिक क्षेत्रात, नव्या क्रांतीचे वारे वाहू लागल्याने शिक्षणाच्या हक्कासाठी, शिक्षणक्षेत्राच्या मागण्यांसाठी, तक्रारींसाठी तरी मोर्चे काढावे लागणार नाहीत, असे आशादायक चित्र निर्माण झाले. त्याआधीही कधी शिक्षणासाठी मोर्चे निघालेच नव्हते. या क्षेत्रात समाजाने किंवा समाजाकरिता नेमके काय मागावयाचे याच्या जाणिवाही जाग्या झालेल्या नसल्याने, घेतल्याशिवाय राहणार नाही, अशी जाणीवजागृती देखील त्यासाठी कुणी करत नव्हते. गावागावांच्या भिंतींवर घोषणा रंगविल्या की शिक्षणप्रसाराचे मिशन साजरे झालेले असायचे. 'रीड इंडिया' नावाची एक मोहीम तेव्हा देशात राबविण्यात आली होती. प्रत्येक गाव साक्षर असले पाहिजे आणि प्रत्येकाला अक्षरओळख असली पाहिजे, हा त्या मोहिमेचा गाभा होता. त्यासाठी गावोगावीच्या घरांच्या भिंती, रस्त्याकडेचे कठडे घोषणांनी रंगले होते. आमचा गाव आता वाचू शकतो, असे ती अक्षरे जगाला सांगत होती... पण प्रत्यक्षात मात्र गळतीमुळे शाळा ओस पडल्याचेच चित्र गावोगावी दिसायचे. शिक्षणाचा हक्क सरकारने बहाल केला आणि या घोषणांना खरा अर्थ प्राप्त झाला. त्या दशकापूर्वीचा भारत आणि त्या दशकानंतरचा



भारत यामध्ये शैक्षणिकदृष्ट्या जमीन-अस्मानाचे अंतर दिसू लागले आहे. आताच्या भारतात, शाळा पाहिलेली नाही, अक्षरांशी खेळलेला नाही आणि भविष्याची स्वप्ने रंगविताना शिक्षणाच्या अभावाने खंतावलेला असा कोणीही दिसणार नाही, असे दिलासादायक चित्र जवळपास सर्व राज्यांत दिसत आहे आणि साक्षरता प्रसाराच्या उद्दिष्टाची शंभरापर्यंतची टक्केवारी गाठण्याची स्पर्धाही राज्याराज्यांत सुरू झाली आहे.

हा कायदा येऊ घातला, तेव्हाची स्थिती मात्र काहीशी वेगळी होती. हा हक्क बजावण्याची मानसिकता ज्यांनी समाजात रुजवायची, त्यांच्यात मात्र, नव्या हक्कनिर्मितीमुळे आणखीनच उदासीनता दाटलेली दिसत होती. अनेक राज्यांमधून निधीच्या नावाने नकारघंटांचा गजर सुरू झाला होता आणि बालकांचा हा हक्क पुरविण्यासाठी राज्य सरकारच्या तिजोऱ्यांमधला खडखडाट वाजू लागला होता. नव्या हक्कासाठी लागणारा हजारो कोटींचा वाढीव निधी उभा कुठून करणार, हा प्रश्न आणि राज्यांच्या नकारघंटा केंद्र सरकारच्या कानावर केवळ आदळत होत्या. तरीदेखील शिक्षणक्षेत्रात एक नवी पहाट उमललीच होती. देशात राष्ट्रीय साक्षरता प्रसार मोहिमेस प्रारंभ झाला, त्याला आता सुमारे चार दशके लोटली आहेत. देशातील प्रत्येक व्यक्ती साक्षर झालीच पाहिजे हे त्या मोहिमेचे उद्दिष्ट होते. त्यावेळी गावागावांत झपाटल्यासारखे प्रौढ शिक्षण वर्ग आणि साक्षरता प्रसार वर्ग सुरू झाले आणि कागदोपत्री अनेक जिल्हे संपूर्ण साक्षर झाले. ही मोहीम राबविण्यासाठी वर्षागणिक सरकारी कोट्यवधी रुपये तिजोरीतून उपसले गेले. १५ ते ३५ वयोटातील सर्वांना संपूर्ण साक्षर करण्याची एक कालबद्ध मोहीम आखली गेली. खरे म्हणजे, कालबद्ध हा शब्दच या मोहिमेमुळे कालबाह्य झाला. २००१ मधील जनगणनेच्या पाहणीनुसार, देशातील ३० कोटी जनता निरक्षरच राहिली होती. मग ८ सप्टेंबर २००९ रोजी, राष्ट्रीय साक्षरता दिनी, पुन्हा नवी साक्षरताप्रसार मोहीम सुरू करण्यात आली. समाजातील साक्षर-निरक्षर भेद संपविण्यासाठी आणि विशेषत: महिला वर्गातील साक्षरता प्रसारासाठी आखलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेला, 'साक्षर भारत' असे नामाभिधान मिळाले; प्रथम अक्षरओळख, मग साक्षरता आणि निरंतर शिक्षण असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले. त्यासाठी गावोगावी लोकशिक्षा केंद्रे सुरू झाली, तीन वर्षांचा नवा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला, तोवर शिक्षणाच्या हक्काची अंमलबजावणीही राज्याराज्यांत सुरू झाली. हक्क बजावणारी पिढी शाळेत पाढे घोकू लागली आणि देशात शिक्षणाचे सुधारित वारे वाहू लागले. देशातील शाळांमध्ये संगणक साक्षरतेचे वारे वाहू लागले. प्राथमिक पातळीवरच ही शैक्षणिक क्रांती यशस्वी झाली, तर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांची गरजदेखील वाढेल, हे लक्षात घेऊन पुढच्या दोन दशकांत देशात ४० हजार नव्या उच्च माध्यमिक शिक्षण संस्थांची गरज भासेल, ३०० हून अधिक नवी विद्यापीठे आवश्यक ठरतील, तर महाविद्यालयांच्या संख्येत काही हजारांची भर गरजेची ठरेल, या जाणिवांनिशी काम सुरू झाले. ही नवी आकडेवारी शिक्षणप्रसाराच्या नव्या मोहिमांच्या अभूतपूर्व यशाचे भविष्यच अधोरेखित करणारी होती.

राज्यघटनेने दिलेल्या अनेक हक्कांसाठी आज देशातील सामान्य जनतेला झगडावे लागत आहे. हक्कांसाठी मोर्चे काढावे लागत आहेत. आणि समाजातील अनेक घटक हक्कांपासून कायमचे वंचितदेखील राहिले आहेत. शिक्षणाचा हक्क मिळाला आणि पाच वर्षांपूर्वी, २०२० मध्ये केंद्र सरकारने शिक्षण क्रांतीचे पुढचे पाऊल उचलले. शिक्षणप्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणून, देशाच्या परंपरा, संस्कृती, भाषास विविधतेतील एकता यांचे भान मनामनात रुजविणारी शिक्षणपद्धती असावी या उद्देशाने नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात आले. नव्या शतकातील शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासातील गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी शालेय शिक्षण व उच्च शिक्षण यामध्ये बदल करण्याची एक योजनाच या धोरणातून आखली गेली आणि विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विद्याशाखांमध्ये शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा वेगळा प्रयोगही सुरू झाला. मातृभाषेतून शिक्षण घेण्याबरोबरच, ज्या सांस्कृतिक धाग्यांनी उभा देश जोडला गेला आहे, त्या विविधतेतील एकतेची परंपरा जपण्यासाठी देशातील अन्य भाषांची ओळखही विद्यार्थ्यांना असावी, यासाठी मातृभाषेसोबत अन्य भाषांचा विकास व संवर्धन करण्याचे उद्दिष्टही या योजनेत होतेच.

देश बदलत आहे, हे नव्या भारतातील प्रत्येकास अनुभवता येत आहे. हक्कांच्या जाणिवा जाग्या होणे हे त्याचे एक चांगले लक्षण आहेच, हक्कांसाठी संघर्ष करणे हा लोकशाहीने प्रत्येकास दिलेला अधिकारही आहे. त्यामुळे, नाही रे वर्गाच्या मागण्यासाठी आहे रे वर्गातून मिळणारा पाठिंबादेखील सकारात्मक मानसिकतेचा पुरावा ठरत आहे. पण अलिकडे, या हक्कांच्या जाणिवा काहीसे वेगळे वळण घेऊ पाहात असाव्यात. तीन-चार दशकांपूर्वी, मागण्यांचा पाठपुरावा करून घेण्यासाठी, त्या पूर्ण करून घेण्यासाठी आणि आपल्याला हवे ते मिळविण्यासाठी निघणारे मोर्चे आणि आंदोलने आता वेगळ्या दिशेने सुरू झाली असावीत. गेल्या दशकभरात विकासाचा वेग क्रांतीच्या वेगाने वाढला. भौतिक विकासाचे चित्र जागोजागी उमटू लागले आणि विकासाची फळेदेखील समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचावी यासाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणीही सुरू झाली आणि हक्क म्हणून ज्या बाबींसाठी पूर्वी आंदोलने, मोर्चे काढावे लागत असत, त्यापैकी अनेक बाबी सहजपणे लोकांस मिळूदेखील लागल्या. कदाचित यामुळेच, आता मागण्यांसाठी, काही मिळविण्यासाठी आणि त्याचे अधिकाधिक लाभ मिळविण्यासाठी निघणारे मोर्चे आंदोलने मंदावली असल्याचे चित्र दिसत असावे.

आता निघणारे मोर्चे, आंदोलनांतून नाकारण्याचा नवाच सूर उमटताना दिसतो. देश बदलत आहे, हे खरे आहेच, पण सहजपणे मिळणारी व ज्यातून समाजाच्या व व्यक्तीच्या विकासाची क्षितिजे विस्तारण्याची संधी मिळते अशा बाबीदेखील नाकारण्याची मानसिकता रुजविण्याचे प्रयत्न होत असल्याचेही दिसते. शिक्षण ही समाजाच्या विकासाकरिता केली जाणारी एक शाश्वत गुंतवणूक असते. आपल्याकडे असलेली कोणतीही गोष्ट इतरांस वाटली तर आपल्याकडची गोष्ट कमी होते. शिक्षणाचे तसे नाही. शिक्षणाचा जेवढा अधिकाधिक प्रसार होईल, नवनवी दालने उघडतील, तेवढी समाजाची प्रगतीच होत असते. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातून नव्या संधी मिळवून देणारे जे जे पदरात पडेल, ते प्राप्त करून घेणे योग्य ठरते. नव्या शैक्षणिक धोरणाने अशा अनेक संधी समोर आणून ठेवल्या आहेत. त्या नाकारण्याऐवजी, स्वीकारण्याची मानसिकता रुजली, तर अधिक चांगले होईल. प्रादेशिक अस्मितांची जपणूक करतानाही, भारत माझा देश आहे, ही प्रतिज्ञादेखील विसरून चालणार नाही. शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या वाटा अंतिम व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट सरकारने समोर ठेवले आहे. एका अर्थाने, शिक्षण क्षेत्रात नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे, नव्या वाटा निर्माण केल्या जात आहेत. त्या वाटा प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचल्या पाहिजेत यासाठी वेगवेगळ्या योजनाही आखल्या जात आहेत. अशा वाटांना वेगळी वळणे मिळू नयेत, याची काळजी घ्यायलाच हवी.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कृत्रिम बुद्धिमत्ता : मानवी बुद्धिमत्तेचा नवा साथीदार

एका गावात आरव नावाचा एक खूप उत्सुक आणि विचार करणारा मुलगा राहत होता. त्याला सगळ्या गोष्टींचं कुतूहल वाटायचं आकाशातले तारे, प्राण्यांचं वागणं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे कॉम्प्युटर!

एके दिवशी शाळेत शिक्षकांनी एक नवीन शब्द सांगितला 'कृत्रिम बुद्धिमत्ता', म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय). आरवला हे ऐकून भारीच वाटलं. ''कॉम्प्युटर माणसांसारखा वागतो? कविता लिहितो? चित्रपट बनवतो? हं, मस्तच की!'' असं त्याने स्वतःशीच म्हटलं.

त्याच रात्री आजोबांजवळ झोपताना आरवने विचारलं,

''आजोबा, खरंच एआय माणसासारखं वागू शकतं का?''

आजोबा हसले आणि म्हणाले, ''अरे, खूप वर्षांपूर्वी काही शास्त्रज्ञांनी असंच स्वप्न पाहिलं होतं की एक दिवस कॉम्प्युटर इतका हुशार बनेल की माणसासारखा विचार करेल, भावना समजेल, अगदी कविता लिहील! एक हुशार गणितज्ञ होता, ॲलन ट्युरिंग, त्याने तर सांगितलं होतं की भविष्यात कॉम्प्युटर इतका हुशार बनेल की माणूस आहे की मशीन, हे ओळखणंही कठीण होईल.''

''पण आजोबा, मग एआय आपल्यासारखं का झालं नाही?''

''तीच तर गंमत आहे'', आजोबा म्हणाले. ''शोध सुरू झाला, पैसे खर्च झाले, पण कॉम्प्युटर केवळ नक्कल करत राहिला. जसं आपण विमान चालवायला फ्लाईट सिम्युलेटर वापरतो- ते सिम्युलेटर खऱ्या विमानासारखं वाटतं, पण खरं नसतं. तसंच एआय पण माणसासारखं दिसतं, पण माणूस नाही. म्हणून काही काळ लोकांनी एआयवर काम करणं थांबवलं यालाच एआय विंटर म्हणतात.''

आरवला आता खरंच उत्सुकता वाटू लागली होती. ''मग माणूस आणि एआय यामध्ये नेमकं वेगळं काय आहे?''

''अगदी बरोबर प्रश्न विचारलास,'' आजोबा म्हणाले. ''पाहिलंस का आपले डोळे, हात, मन, भावना या सगळ्यांचं संगम आपल्याला खास बनवतं. कॉम्प्युटरला हे सगळं शिकवणं अवघड आहे. आपण एका मांजरीकडे पाहून लगेच समजतो ती मांजर आहे. पण एआयला लाखो मांजरींचे फोटो दाखवावे लागतात. कारण आपण स्वप्नं पाहतो, कल्पना करतो, पण कॉम्प्युटरला हे जमत नाही.''

''मग एआय अजूनही फार मागं आहे वाटतं?''

''हो आणि नाही. शास्त्रज्ञांनी नंतर असा विचार केला की जर एआयला माणसासारखं बनवणं कठीण असेल, तर मग अशा प्रकारचं एआय बनवूया जे माणसासारखं नसतानाही उपयोगी ठरेल. यालाच आपण आजचं कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणतो. आजचा एआय गाणी लिहितो, भाषांतर करतो, चित्रं काढतो, डॉक्टरांना मदत करतो आणि अगदी प्लॅस्टिकसुद्धा खराब होण्यासाठी उपयोगी पडतो!''

''वा!'' आरव खुश झाला. ''मग मस्तच आहे!''

''थांब थांब,'' आजोबा थोडे गंभीर झाले. ''जसं चाकू भाज्या कापायला उपयोगी, तसाच मारायलाही- तसंच एआयचं आहे. काही लोक खोटे फोटो, खोट्या बातम्या, किंवा युद्धासाठी एआय वापरू शकतात. काही वेळा तर एआय तुमचं मनही हॅक करू शकतं. एआय तुम्ही काय पाहता, काय ऐकता हे समजून तुम्हाला चुकीच्या गोष्टींवर विश्वास ठेवायला लावू शकतं.''

''ओह! मग आपल्याला काय करायला हवं?''

''आपल्याला हवी सत्यग्राही आणि सत्याग्रही एआय- जी नेहमी सत्य सांगेल, खोटं ओळखेल आणि तुम्हाला फसवू देणार नाही.''

आरव विचारात पडला, ''पण एआयमुळे माणसांच्या नोकऱ्या तर जातील ना?''

आजोबा हसले. ''हो, काही नोकऱ्या जातील, पण नवीनही निर्माण होतील- जास्त आणि चांगल्या! जर आपण आपल्या सर्जनशीलतेला वाढवलं, नवनवीन कल्पना केल्या, तर एआय आपल्याला मदतच करेल. आपण हळू असतो, पण भावनांनी भरलेले असतो. एआय जलद असतो, पण भावनाशून्य.''

''म्हणजे आपल्याला घोकंपट्टी न करता, नवनवीन विचार शिकायला हवा!'' आरव उत्साहात म्हणाला. त्या रात्री आरवने डोळे मिटले. त्याच्या मनात एक नवीन स्वप्न होतं एक असा भविष्यकाळ, जिथे माणूस आणि एआय एकत्र, हातात हात घालून, जगासाठी चांगल्या गोष्टी घडवत होते.

**राजेश वासुदेव कोगदे**/९६५७१५०९६३

### पहिली वारी : श्रद्धेची एक सुंदर वाटचाल



यंदाचं वर्ष माझ्यासाठी फारच खास ठरलं. संत ज्ञानेश्वर माउलींच्या पादुका पालखीसोबत माझी पहिली वारी केली. आळंदीपासून पुण्यापर्यंतचा प्रवास केवळ शारीरिक नव्हता, तो आत्म्याला स्पर्श करणारा होता आणि माझ्या आयुष्यात तो एक अविस्मरणीय क्षण ठरला. वर्षानुवर्षे माझ्या मनात ही वारी करण्याची इच्छा होती. पण २३ किलोमीटर चालायचं म्हणजे काहीसं कठीणच वाटत होतं. माझे पती मात्र दरवर्षी श्रद्धेने वारी करत आहेत. त्यांचं समर्पण पाहता पाहता माझ्या मनात हळूहळू धाडस निर्माण झालं. आणि मग एक दिवस मी ठरवलं की, यंदा मी चालणार. माउलीवर श्रद्धा ठेवून!

२० जूनच्या पहाटे ४ वाजता आम्ही घरून निघालो. आदल्या दिवशी मुसळधार पाऊस झाला होता आणि अजूनही आभाळ थोडं ढगाळच होतं. तरीही, मनात विश्वास होता की माउली सांभाळेल. आम्ही टॅक्सीनं ५ वाजता आळंदीत पोहोचलो. पुढे गाड्यांना परवानगी नव्हती. त्यामुळे आम्ही पायी चालायला सुरुवात केली. रस्त्यावर भक्तांची गर्दी, सगळे आपापल्या श्रद्धेने चालत होते. कोणाच्याही चेहऱ्यावर थकवा नव्हता, फक्त भक्ती आणि समर्पण.

इंद्रायणी नदी पार करताना माझं मन स्तब्ध झालं. कालच्या पावसानं नदी दुथडी भरून वाहत होती. तरीही त्या क्षणी काहीतरी शांत आणि पवित्र वाटत होतं. सकाळच्या कोवळ्या प्रकाशात आळंदीचं रूप भारावून टाकणारं होतं. सर्वत्र माउलींचं नामस्मरण, भजन, टाळ- मृदंगाचा गजर, अंगावर शहारे आले.

गांधीवाड्याजवळ पोहोचलो. पादुकांची पहिली विश्रांती तिथेच असते. आम्ही नतमस्तक झालो, पावसाची हलकी सर आणि माउलीच्या वाड्यासमोर जमलेली हजारो भक्तांची गर्दी...सहज डोळे मिटले आणि एकच भाव मनात 'कृतज्ञता.' त्या वादळासारख्या गर्दीतही एक विलक्षण शांतता होती, भक्तीची, समर्पणाची आणि विश्वासाची. पालखीचं दर्शन घेतलं आणि पुढच्या प्रवासासाठी स्वतःला तयार केलं.

चालत असताना एक दृश्य मनाला भिडून गेलं. काही स्त्रिया गावाकडून आल्या होत्या, अनवाणी पायांनी, डोक्यावर तुळशीचं वृंदावन घेत, शांतपणे चालत होत्या. मी त्यांच्याशी बोलले, विचारलं, तुम्ही कुठून आलात? त्या म्हणाल्या, बुलढाण्याहून आलोय. रोज १२ तास चालतो आम्ही. हे ऐकून मी अवाक् झाले. पण त्यांच्या चेहऱ्यावर थकवा नव्हता. उलट एक तेज होता. विठ्ठल-रखुमाईचं दर्शन घेण्याची ओढ त्यांच्या डोळ्यांत होती.

या वारीत सगळे एकसमान, लहानांपासून मोठ्यांपर्यंत. चार वर्षांचा बालक आणि ऐंशी वर्षांचे आजोबा, सगळे चालत होते, 'ज्ञानोबा माउली, तुकाराम!' म्हणत. वातावरण भक्तीने भारलेलं होतं.

अखेर सहा तासांच्या प्रवासानंतर, आम्ही सकाळी ११ वाजता दगडूशेठ गणपती मंदिरात पोहोचलो. रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले लोक, फुलांनी सजलेले दरवाजे, आवाज करणारे शंख आणि भजनांचा गजर. त्या सोन्याच्या सिंहासनावर बसलेले बाप्पा, गर्दीतून डोकं वर करत त्यांच्या झलकदार रूपाकडे पाहताना, क्षणभर वाटलं, आपण काहीच मागू नये. फक्त मन भरून 'धन्यवाद' म्हणावं..

ही माझी पहिली वारी. पण आयुष्यभर लक्षात राहणारी.

माउलीच्या कृपेने हे अनुभवायचं भाग्य लाभलं. यापेक्षा आनंदाचं दुसरं काहीच नसेल. 'विठ्ठल विठ्ठल'च्या गजरात, वाऱ्यावर भक्तीचा साक्षात्कार घडवत वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने ६ जुलै २०२५ रोजी साजरी होणाऱ्या सोहळ्यासाठी पंढरपूरच्या पवित्र यात्रेवर निघाले आहेत.

ताल वाजे मृदूंग वाजे वाजे हरीचा वीणा ॥
माउली निघाले पंढरपूर मुखाने विठ्ठल विठ्ठल बोला ॥
जय जय राम कृष्ण हरी

**निलजा संकेत परांजपे**/पुणे

### पाऊले चालती पंढरीची वाट....

भक्त पंढरपूरच्या दिशेने चालत आहेत. ती वाट आध्यात्मिक आहे, ती भक्तीची वाट आहे, ती विठ्ठलाच्या दर्शनासाठीची वाट आहे. जिथे हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात. त्यात भक्ती, समर्पण, एकता आणि हरिपाठाचे महत्त्व दिसून येते. हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात ही परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचं जिवंत रूप आहे. आषाढी एकादशीच्या आधी लाखो भाविक पालखीतून विशेषतः संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पंढरपूरच्या विठ्ठल-रुखमाई मंदिरात पोहोचतात. हे वारकरी टाळ-मृदुंगाच्या गजरात, भजन-गजर करत, ज्ञानोबा-तुकोबा म्हणत, साध्या पोशाखात, भक्तिभावाने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. ही वारी फक्त धार्मिक यात्रा नाही, तर एक समाज जोडणारी, समतेचा संदेश देणारी, श्रम व भक्ती यांचा संगम करणारी चळवळ आहे.

वारी यात्रेचा महत्त्वाचा भाग म्हणजे हजारो वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे चालत निघतात. शेतकरी मोठ्या प्रमाणावर असतात. कष्टकरी महिला सगळ्यांचा सहभाग वारीत असतो. वारकरी संप्रदायात लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, पुरुष-महिला हा भेदभाव नसतो. एकमेकांना माउली माउली म्हणतात. नमस्कार करतात. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, सोपानकाका, संत जनाबाई, मुक्ताबाई, संत गोरा कुंभार वारकरी संप्रदायात अनेक थोर संतांनी योगदान दिले आहे. हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होते. ही यात्रा भक्तिपूर्ण भावना आणि परंपरेने भरलेली आहे. ज्यामध्ये भक्त आपले श्रद्धा आणि प्रेम विठ्ठलाला दर्शवतात.

वारी ही महाराष्ट्राची एक प्रसिद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. ती भक्तांना एकत्र आणते. वारीमध्ये भक्त मंडळी पंढरपूरला येऊन विठ्ठलाची पूजा करतात आणि विविध धार्मिक विधी पार पाडतात. ही परंपरा महाराष्ट्रातील लोकांच्या श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक आहे. वारी यात्रेचा महत्त्वाचा भाग म्हणजे हजारो वारकरी दूरदूरून चालत येत पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी निघतात. मुख्यतः ही वारी संत ज्ञानेश्वरांची आळंदीहून आणि संत तुकारामांची देहूहून पालखी घेऊन सुरू होते. पायी जाताना अनेक गावांत थांबे घेत, भजन, कीर्तन, अभंग गात वारकरी पुढे जातात. प्रत्येक टप्प्यावर त्यांची शिस्त, निष्ठा आणि सामूहिक भावना दिसून येते. ही परंपरा अनेक शतकांपासून अखंडपणे चालू आहे.

दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास महाराष्ट्रातील हजारो वारकरी आपल्या विठोबा भेटीच्या ओढीने वारी करत पंढरपूरला जातात. त्यांच्या ओठांवर अभंग, टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा माउली, तुकाराम महाराज की जय अशा जयघोषांनी वातावरण भक्तिमय होतं. हे दृश्य फक्त चालणं नाही, तर श्रद्धेचं, भक्तीचं आणि समर्पणाचं दर्शन असतं.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### माळेकाराचा दृष्टांत

श्री चक्रधर स्वामी यांनी मराठी भाषेत विपुल साहित्य निर्माण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या आठवणी लीळाचरित्रात असून दृष्टांत पाठाची निर्मिती तेथूनच झाली आहे. सर्वज्ञ अर्थात श्री चक्रधर स्वामी निरूपण करत असताना आपला आशय श्रोत्यांना कळावा म्हणून दृष्टांत देत असत. असे अनेक दृष्टांत म्हाइंभटांनी संकलित केलेल्या लीळाचरित्रात विखुरलेले आहेत. त्यातील निवडक दृष्टांत घेऊन केशीराज बास यांनी दृष्टांत पाठ हा ग्रंथ तयार केला आहे. ''माळेकाराचा दृष्टांत'' हा त्यातीलच एक दृष्टांत आहे. या दृष्टांतात आपल्याला यादव कालीन मराठी भाषेचे दर्शन घडते.

कव्हणी एकु माळेकार माळेयावरि उभा असे : तयाचेया शेताचीए लवणीं चोरू एकु असे : तो वाटा घे : वोहरें मारी : ब्राह्मणू मारी : संन्यासी मारी तो तें देखे परि उगाचि असे : मग एकु दिशु तो रायासि सांपडे : मग तो रावो तयातें खैरी जुंपावेया धाडी : मग अवघीये गावीचा लोक पाहावेया ये : तो म्हणे : कैसा बापुडा : गोरा गोमटा : धारे धाकुटा राणीचेया पूत ऐसा दिसतु असे : मा रावो यातें खैरीं कां जुंपिताए : यातें पाखाळु कां नेघें : मग तो माळेकारू कांबळेयाची बुथी घालौनि पाहावेय ये : तवं ती आईके : मग म्हणे : एणें जीयें पापें केलीं आहाति तीयें मी जाणतु असे कीं : याचें लांब खांड तें महुरी एव्हडें करावें। तथा लहान खांड तें महुरी एव्हडें करावे! याचां खांडी गांवो पूजावा ॥

या दृष्टांतात सर्वज्ञ अर्थात श्री चक्रधर स्वामी सांगतात की, माणसे बरेचदा घृणा वाटावी किंवा किळस वाटावी अशा प्रकारचे दृष्कृत्य करीत असतात. या छोट्याशा दृष्टांतात मानव कल्याणाचे तत्त्वज्ञान अगदी साध्या सोप्या भाषेत सांगितलेले आहे. शेताच्या खोलगट भागात एक चोर लपून बसायचा व येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना लुटायचा. त्यासाठी कधी कधी तर तो त्यांना जीवे देखील मारत असे. तो करीत असलेली दृष्कृत्य कोणीच पाहत नाही, असा त्याचा समज होता. परंतु पिकाचे संरक्षण करण्यास शेतात उंचावर बसलेला माळेकार त्या चोराची सर्व कृत्य पाहत होता. माळेकार हा चोराच्या संपूर्ण दृष्कृत्यांचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. काही दिवसांनी राजाने चोराला पकडले व त्याला रहाटगाडग्याला जुंपण्याची शिक्षा दिली. चोर ही शिक्षा भोगत असताना, एक दिवस घोंगडी पांघरूण माळेकार तेथे आला आणि म्हणाला, या चोराच्या सर्व दृष्कृत्यांचा मी साक्षीदार आहे. त्याने केलेल्या गुन्ह्याच्या मानाने याला करण्यात आलेली शिक्षा ही फारच कमी आहे.

येथे दृष्टांतानंतर केशीराज बास सांगतात, माळेकार ज्या प्रमाणे घोंगडी पांघरूण होता, त्याचप्रमाणे मनुष्य देहाची घोंगडी पांघरूण परमेश्वर आपल्या अवती-भोवती वावरत असतो. आपण करत असलेली सर्व कृत्ये तो पाहत असतो आणि वेळो वेळी आपल्याला, आपण केलेल्या वाईट दृष्कृत्यांची शिक्षा देत असतो. त्यामुळे गावकऱ्यांना त्या चोराविषयी कोणतीही सहानुभूती वाटत नव्हती, त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीने वाईट कृत्य केल्यास त्या विषयी आपल्याला देखील कोणत्याच प्रकारची सहानुभूती वाटू नये. प्रत्येकाला परमेश्वर हा त्याच्या कर्मानुसार कोणत्या ना कोणत्या प्रकारची शिक्षा देतच असतो. आपल्याला बरेचदा असे वाटते की, ईश्वराचे काहीही अस्तित्वच नाही, परंतु तसे नाही. ईश्वर हा सदैव आपल्या अवतीभोवती वावरत असतो, याचा अनुभव प्रत्येकाला कधीतरी आलेला असतोच, यात काहीही शंका नाही.

**नितीन श्रीकृष्ण ढोरे**/९४२२१९३७८०

### शाळेला चाललो आम्ही!

विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात शाळेला नुकतीच सुरुवात झाली आणि सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अंगणवाडी, बालवाडीपासून तर कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत सर्वत्र शाळा सुरू झाल्या. पालक आपल्या पाल्याला पहिल्या दिवशी जमेल तसे कोणी गाडीवर, सायकलवर, ऑटो रिक्षाने, स्कूल बसने शाळेत आणून सोडत होते. काही शाळेने तर मोठ्या सन्मानाने चक्क वाजतगाजत बैलगाडीने विद्यार्थी शाळेत आणले. आपल्या पाल्याला शाळेत जाताना पाहून पालकांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडत होता. काहींच्या डोळ्यात आपल्या मुलाकडे भविष्याच्या दृष्टिकोनातून मोठ्या आशेने बघून आनंदाचे अश्रू येत त्यांना टाटा करीत होते. मुले सुद्धा उड्या मारत टाटा करून त्यांना प्रतिसाद देत होते. एकंदरीत सर्व विद्यार्थी आपल्या शाळेचा नवीन गणवेश परिधान करून टिफिन घेऊन शाळेला चाललो आम्ही..! असे म्हणत मोठ्या आनंदात शाळेत आले आणि तितक्याच उत्साहात शाळेतील शिक्षकांनी त्यांचे निरनिराळ्या पद्धतीने स्वागत केले.

काही ठिकाणी पुष्पगुच्छ देऊन, काही ठिकाणी वाजत गाजत, काही ठिकाणी झाडांची रोपे भेट देऊन तर काही ठिकाणी चक्क मुलींची पावले हळदीमध्ये भिजवून पांढऱ्या कागदावर ठसे उमटवून व त्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. शासनाने सुद्धा या मुलांच्या आगमनामध्ये सहभाग घेऊन मुलांना शाळेमध्ये येण्यास प्रोत्साहित केले. पालघर जिल्ह्यातील दुर्वेश येथील प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन आदिवासी मुलांचे पुष्पगुच्छ व नवीन पुस्तके देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी त्यांनी मुलांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढविले. मुलांची नावे विचारून त्यांना भविष्यात काय व्हायचे हे विचारून त्यांचा उत्साह वाढविला. मुलांनी सुद्धा त्यांना आनंदाने प्रतिसाद दिला. शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहाने पार पडला परंतु आता अभ्यासक्रम शिकवण्याला हळूहळू जेव्हा सुरुवात होईल तेव्हा शिक्षकांची, पालकांची आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी वाढू लागेल. यावर्षीपासून पहिल्या वर्गाला सीबीएसई पॅटर्न प्रमाणे अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे परंपरागत अभ्यासक्रमाला फाटा देऊन नवनवीन कृतियुक्त शिक्षणाची अंमलबजावणी होत आहे. संगणकीय शिक्षणावर भर दिला जात आहे. प्रोजेक्टरवर शिकवला जात आहे. डिजिटल बोर्ड आले आहेत. शिकवण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळत आहे. तो आत्मनिर्भर होत आहे. थोडक्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा प्रत्येक शाळेचा दृष्टिकोन आहे. अशा वेळेस पालकांनी सुद्धा आपल्या पाल्याकडे आत्मीयतेने लक्ष देऊन त्याला वेळोवेळी प्रोत्साहित केले पाहिजे. जेणेकरून त्याचा शिकण्यामध्ये उत्साह वाढेल आणि रोज ''शाळेला चाललो आम्ही'' म्हणत आनंदाने तो शाळेत जाईल.

**धनंजय पांडे**/९४०४९१७८४७

### पाणीपुरीची राजधानी; अकोला नगरी

अकोलेकर खवय्यांच्या यादीत पाणीपुरी अव्वल स्थानी आहे. अकोल्यात कुठल्याही रस्त्याने जा, पाणीपुरीची गाडी नाही असे होणार नाही. हिरवी मिरची, पुदीना, कोथिंबीर,काळे मीठ आणि त्यासोबतच अकोलेकरांना वेड लावणारा सिक्रेट असा पाणीपुरी मसाला. विशेष म्हणजे या सगळ्यांचे प्रमाण



ठरलेले असते. किती लिटर पाण्यात किती मसाला घालायचा याचे अचूक प्रमाण अकोल्याच्या पाणीपुरी विक्रेत्यांकडे आहे. सोबत बारीक चिरलेला कांदा आणि उकडलेला बटाटा. लाकडी रवीने ढवळलेल्या ठसकेबाज पाण्यात कांदा, बटाटा भरून बुडवलेली पुरी अहाहाहाहा... क्या बात है! स्वर्ग सुख म्हणतात ना ते हेच!

संध्याकाळी फेरफटका मारल्यानंतर तहानलेला कोरडा घसा ओला करण्यासाठी पाणीपुरीच उत्तम. उन्हाळ्यात खवय्यांना शीतलता देण्यासाठी पाणीपुरीसाठी थंडगार पाणी वापरले जाते. गोलगप्पे, गुपचूप, पाणीपुरी अशी विविध नावे असलेला हा पदार्थ अकोल्यात पाणीफुग्गे म्हणूनही प्रसिद्ध आहे. अकोल्याच्या पाणीपुरीची खासियत म्हणजे येथे ग्राहकांची आवड महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक ग्राहकाच्या आवडीप्रमाणे बटाट्यामध्ये मीठ, मसाल्याचे प्रमाण कमी जास्त करून सर्व्ह केले जाते. एका फेरीत किमान आठ-दहा जण पाणीपुरीचा सहज आस्वाद घेऊ शकतील एवढा प्रचंड वेग आमच्या इथला पाणीपुरीवाला धारण करू शकतो. ठसकेबाज पाणीपुरी खाल्ल्यानंतरचा पराक्रम शांत करण्यासाठी गोड खटाई भरलेली पापडी किंवा आलू, मीठ भरलेली पापडी दिली जाते.

कुठल्याही शुभप्रसंगी होणाऱ्या मेजवानीत पाणीपुरीला स्थान असतेच. परगावाहून आमच्याकडे आलेला पाहुणा अकोल्याच्या पाणीपुरीची चव घेतल्याशिवाय जात नाही. शिकण्यासाठी वा नोकरीसाठी पुण्या-मुंबईला गेलेली आमची तरुणाई सुटीत जेव्हा अकोल्यास येते तेव्हा येथील पाणीपुरीवर अक्षरशः तुटून पडते. अकोल्याच्या पाणीपुरीचे सुख जगात अन्यत्र कुठेही नाही. म्हणूनच तर खवय्यांच्या दुनियेत अकोल्यास पाणीपुरीची राजधानी संबोधले जाते. खरं तर आपली खाद्यसंस्कृती आपली सुबत्ता दर्शवते, या माध्यमातून होणारी आर्थिक उलाढाल, रोजगार निर्मिती देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देऊन जाते. तर मग येताय ना पाणीपुरीच्या राजधानीत पाणीपुरीचा आस्वाद घ्यायला!

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उबाठा शिवसेनेकडून हिंदी भाषा सक्तीच्या अध्यादेशाची होळी

## आ. बबनराव लोणीकर यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जून**

राज्य सरकारने त्रिभाषा सुत्रीचे धोरण स्विकारल्यामुळे हिंदी भाषा सक्तीची केल्याचा जीआर काढल्याच्या विरोधात दि २९ जून रोजी येथील गांधी चौकात शिवसेना उबाठा च्यावतीने अध्यादेशाची होळी करण्यात आली. तसेच भाजपचे आ. बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्याबद्दल केलेल्या अपमानास्पद वक्तव्याबाबत त्यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

राज्यात इयत्ता पहीलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्यात येणार असल्याच्या विरोधात शिवसेना उबाठाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी येथील गांधी चौकात राज्य सरकारच्या निर्णयाचा विरोध करीत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी हिंदी सक्तीचा जीआर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाळून निषेध व्यक्त केला. तसेच भाजपचे आ. बबनराव लोणीकर यांनी एका सभेत शेतकऱ्यांबाबत केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा जाहीर निषेध करीत आ.लोणीकर यांच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन करीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष उध्दवराव गायकवाड, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, माजी आ. संतोष टारफे, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे, वसीम देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# एवढी दहशत कोणाची? उपमहानिरीक्षकाच्या बैठकीत अवैध धंद्यावर मौनच

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जून**

जिल्ह्यात मागील सात ते आठ वर्षापासून अवैध दारू विक्री, मटक, जुगार, अवैध वाळू तस्करी, वाढते गुन्हेगारीचे प्रमाण, तरूणांची व्यसनाधीनता यावर एकाही प्रतिष्ठीत नागरिक, पत्रकार किंवा लोकप्रतिनिधींनी चकार शब्दही उपमहानिरीक्षकांच्या बैठकीत काढला नाही, याचे आश्चर्य वाटायला लागले आहे. एवढी दहशत कोणाची? असा विचार सर्वसामान्यांना पडायला लागला. एरव्ही जनतेच्या प्रश्नाबाबत तसेच अवैध धंद्याबाबत खा-जगीत बोलणारे बैठकीत मौन धारण करून बसलेले दिसत होते.

जिल्ह्यात मागील सात ते आठ वर्षापासून अवैध वाळू उपसा, अवैध दारूविक्री तसेच मटका, जुग-ार, अवैध गुटखा विक्री आदी धंदे मोठ्या प्रमाणात फोफावले आहेत. गावागावात घरपोच दारू उप-लब्ध होत असल्याची तक्रार कंजारा येथील महिलांनी नुकतीच केली आहे. अनेक गावांतील महिलांनी अवैध दारू विक्री बाबत एल्गार पुकारला आहे परंतु दारूचे प्रमाण काही कमी होतांना दिसत नाही. गावातील तरूण मंडळी व्यसनाधीन होत आहे. अनेक संसार उध्वस्त होत आहेत. तरूण मुले मटका, जुगार यांच्या नादी लागून बरबाद होत आहेत. वाळू माफीया सर्रासपणे अवैध वाळू उपसा करीत दररोज हजारो रूपये कमावतांना दिसत आ-हेत. कालचे रस्त्यावर भटकणारे बिनकामी आज गळ्यात, हातात सोन्याचे दागिने घालून समाजात वावरत असतांना दिसत आहेत.

अवैध धंद्यांच्या विरोधात भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. डॉ संतोष टारफे, आ. डॉ प्रज्ञा सातव यांच्यासह अनेकांनी उपोषणे केली. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदने दिली परंतु याचाच काहीच उपयोग झाला नसल्याचे आतापर्यंत दिसत आहे. उलट जिल्ह्यात अवैधधंद्यांचे पेव फुटले असून त्यातून तरूण गुन्हेगारीकडे वळत असतांना दिसत आहे.

दि २६ जून रोजी नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्याबाबत बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी लोकप्रतिनिध, सामाजिक संघटना, व्यापारी, प्रतिष्ठीत नागरिक, पत्रकार यांनाही निमंत्रण देण्यात आले होते. परंतु या बैठकीत अवैध धंद्याबाबत कोणीच तक्रार केली नाही. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रश्न, समस्या अवैध धंद्यांची आहे. ग्रामीण भागातला तरूण व्यसनाधीन आणि गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळत आहे. हा सामाजिक प्रश्न मांडणे गरजेचे असतांना दुसऱ्याच विषयांवर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात अवैध धंद्यांना कोणी राजकीय पाठबळ देत आहे का? पोलिस प्रशासन जोपर्यंत अवैध धंदे चालविणाऱ्या म्होरक्यावर जबरदस्त कारवाई करीत नाही तोपर्यंत अवैध धंदे बंद होणार नाहीत अशी चर्चाही होत आहे.

# तीन महिलांसह १० जण सहा महिन्यांसाठी हद्दपार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जून**

सततचे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्या दहा जणांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली असून तीन महिलांसह दहा जणांना पुढील सहा महिन्यांपर्यंत हिंगोली जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी काढले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मागील काही दिवसांत पोलिस विभागाने बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या विरूध्द कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या सुचनेनुसार अवैध व्यवसाय करणाऱ्या विरूध्द कारवाई केली जात आहे. यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकाकडून दररोज कारवाई केली जात आहे.

जिल्ह्यात बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या तसेच वेळोवेळी गुन्हे करणाऱ्यांचे हद्दपारीचे प्रस्ताव दाखल करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी दिले होते. त्यानुसार कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे यांनी अवैध दारू विक्रीचे गुन्हे असलेल्या तीन महिलांचे प्रस्ताव सादर केले होते. याशिवाय सुमित पुंडगे, गोपाल पवार, रोहन भिसे, भुषण खिल्लारे, संजय चव्हाण, दिलीप जयस्वाल, प्रभाकर जाधव यांच्या विरूध्द संबंधित पोलिस ठाण्यांनी हद्दपारीचे प्रस्ताव दाखल केले होते. त्यांच्या वर्तनात कोणताही बदल होत नसल्याने व त्यांचे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीव हालचालीमुळे परिसरातील नागरिकांच्या शरीराविरूध्द व मालाविरूध्द धोका उत्पन्न होत असल्याने प्रस्ताव दाखल करण्यात आले होते.

या प्रस्तावांची तपासणी करून दहा जणांना हिंगोली जिल्ह्यातून पुढील सहा महिन्यांसाठी हद्दपार करणयत आले आहे. त्यांच्या हद्दपारीचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी काढले आहेत.



**हिंगोली– शहरातील स्व. शिवाजीराव देशमुख सभागृहाच्या वरच्या मजल्यावर नगर पालिकेच्यावतीने बॅडमिंटन हॉल बांधण्यात आला आहे. या हॉलमध्ये अनेकजण दररोज सकाळी, संध्याकाळी सराव करणयसाठी येतात परंतु याठिकाणी पुरेशा सुविधा नसल्यामुळे खेळाडूंमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### पूर, वसई येथे महिलांना प्रशिक्षण



हिंगोली– देसाई फौंडेशन आणि उगम ग्रामीण विकास संस्था उमरा यांच्या संयुक्त विद्यमाने वसई व पुर येथे बचत गटाच्या महिलांना शेळी पालन आणि चॉकलेट बनविणे या विषयी प्रशिक्षण दिले. तसेच शहरी भागासोबतच ग्रामीण भागात सुद्धा चॉकलेटची मागणी आहे आणि सर्व वयोगटात आवडीने खालले जाते. त्यामुळे महिला बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये चॉकलेट तयार करण्याची पद्धत, त्यासाठी लागणारे साहित्य, पॅकिंग करण्याच्या पद्धती आणि लागणारे भांडवल आणि मिळण-ारा नफा याविषयी प्रशिक्षक क्रांति पाईकराव यांनी सांगितले. आर्थिक उत्पन्नासाठी शेळीपालन महिलांनी करावे तसेच यासाठी लागणारे भांडवल, लसीकरण आणि घ्यावयाची काळजी याविषयी दिशांत पाईकराव यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी स्वाती वानखेडे, विद्या कदम, सिद्धार्थ निनुले, भूषण पातोडे, बालाजी मोरे यांनी परिश्रम घेतले.

# पोलिस दलाचे जिल्ह्यात एकाचवेळी कोम्बींग ऑपरेशन

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २९ जून**



जिल्ह्यात सराईत गुन्हेगार व अवैध धंदे यांच्याविरोधात तसेच चोरी, जबरी चोरी, घरफोडी व दरोडा या गुन्ह्या-तील आरोपींना नियमित तपासणी व त्यांचे विरूध्द कडक प्रतिबंधक कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्यात एकाचवेळी एकाच दिवशी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले यावेळी विविध कारवाया करण्यात आल्या.

दि २८ जून ते २९ जूनच्या पहाटे तीन वाजेपर्यंत कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. ४४ ठिकाणी जिल्ह्यातील तडीपार झालेले आदेश तसेच फरार व पाहीजे असलेले आरोपी, रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, मिश्र वस्तीमध्ये तपासणी करण्यात आली. सदर मोहीमेत जिल्ह्यातील न्यायालयाकडून वेळोवेळी समन्स निघूनही तारखेस न्यायालयात हजर राहत नव्हते व ज्यांचेबाबत अटक वॉरंट निघाले होते अशा नॉन बेलेबल वॉरंट निघालेल्या ४, बेलेबल वॉरंट निघालेल्या ४ जणांना वॉरंट बजावण्यात आले. गंभीर गुन्ह्यातील ४ फरार आर-ोपींना अटक करण्यात आली. एका तडीपार इसमाविरूध्द महाराष्ट्र पोलिस कायदानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच कलम ११२ प्रमाणे ४ जणांवर कारवाई करण्यात आल. सदरील मोहीम पोलिस अध-ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, सुरेश दळवे, गुन्हे शाखेचे पोनि विकास पाटील, पोनि गणेश राहीरे, पोनि, मोहन भोसले, पोनि सुधीर वाघ, पोनि संदीप मोदे यांच्यासह विविध ठाण्याचे प्रभारी व सपोनि अंमलदार यांनी केली आहे.

# मरणोत्तर नेत्रदान केल्याबद्दल बाहेती परिवाराचा सत्कार

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २९ जून**



स्व. शांताबाई बाहेती यांचे १० दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांच्या परिवाराने मरणोत्तर नेत्रदानाचा निर्णय घेतला. त्यामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळणार असल्यामुळे येथील अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनाच्यावतीने बाहेती परिवाराचा सत्कार करण्यात आला आहे.

अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनाच्यावतीने मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान करण्याचे आव-ाहन करण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. स्व. शांताबाई बाहेती यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराने नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. जिल्हा शासकीय रूग्णालयाच्या पथकाने शस्त्रक्रियेद्वारा नेत्रदान करण्यात आले. या नेत्रदानामुळे २ अंध व्यक्तींना दृष्टी मिळाली आहे. या कार्यामुळे अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनाच्यावतीने बाहेती परिवाराचा सत्कार करण्यात आला. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा अर्चना सोनी, कांता काबरा, अर्चना जाजू, संगीता झंवर, कांचन काबरा, शिल्पा दाड, सचिव प्रीती खंडेलवाल, कोषाध्यक्षा सुन-ीता खंडेलवाल, मीना झंवर, रेश्मा संगेवार, विजया अग्रवाल यांनी बाहेती परिवारातील आरती बाहेती, प्रमोद बाहेती, प्रांजल बाहेती, सुभाष बाहेती, सरला बाहेती, पवन बाहेती, प्रीती बाहेती, शांता बाहेती, रत्नकला बाहेती यांचा सत्कार केला.

# हिंगोलीत मराठवाडा साहित्य परिषदेच्या कवी संमेलनात बहारदार कवितांचे सादरीकरण

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २९ जून**



मराठवाडा साहित्य परिषद, शाखा हिंगोली तर्फे दि २८ जून रोजी शनिवारी नूतन साहित्य मंदिर वाचनालयात कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. बहाद-रदार कवितांना श्रोते मंत्रमुग्ध झाले.

या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी म सा प अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर हे होते तर प्रमुख पाहुणे म सा प केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्राचार्य नामदेवराव वाबळे हे होते. कवी संमेलनाचे प्रास्ताविक हिंगोली शाखेचे कार्यवाह दिलीप धामणे यांनी केले. यामध्ये त्यांनी हिंगोलीतील साहित्यिक चळवळीला उत्तेजन देण्यासाठी असेच विविध उपक्रम राबविण्यासाठी सर्वांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कवी रतन आडे यांनी ओघवत्या, रसाळ, संवादात्मक पद्धतीने केले.

सहभागी कवी कवयित्रींनी विविध विषयांवर आपल्या कविता सादर केल्या. विशेषतः पाऊस, निसर्ग, वारी, प्रेम, लेक, शेतकरी, शिक्षण यासंबंधी कविता होत्या.

नामेदवराव वाबळे यांनी 'पाऊस चिमण्या पाखरांच्या चोचितला घास, दडून बसला की हमखास गळफास' ही भीषण वास्तव मांडणारी कविता सादर केली.

कलानंद जाधव यांनी दिंडी:-माय लेकी भेटीसाठी, अतुर झाल्या झुंडी,पाय चालती टाळ बोलती, विठ्ठल विठ्ठल तोंडी, दिंडी चालली, नामा ज्ञानोबाची,दिंडी'ही कविता सादर करून भक्ती रसात न्हाऊन टाकले. रतन आडे यांनी 'गोड हसली, कधी न रुसली शुभ्र तारका सोजी फुल असुनी, फुलात बसुनी फुलास असते राजी... राजी असी लाडकी माझी', ही लेकीवरची कविता सादर केली.

सुमन गोपाल दुबे यांनी 'नाथ, मेरे ले संदेश श्याम रंग बादल भिजवाऊँ मैं राधा रुक्मिणी ना मीरा क्या पहचान बताऊँ ।' तर संगीता चौधरी यांनी 'तू असावा माझ्यासवे' ही भावपूर्ण कविता तर डॉ. राधिका देशमुख यांनी बहुरुपी 'कधी कधी माझे च शब्द होतात निशब्द. अव्यक्त भाव मनाचा व्यक्त करून जातात. कधी कधी माझे शब्द करतात सांत्वन. दुसऱ्यांबद्दल करते जेव्हा मी माणुसकीने चिंतन.' एक मनोभाव चित्रित करणारी कविता सादर केली.

आश्विनी देशमुख यांनी 'काळ्या मातीच्या कुशीत, ज्वाला पोटात निघत' ही शेतकऱ्याच्या जीवनावरची कविता सादर केली. पारिजात देशमुख यांनी 'विठ्ठला तुझ्या भेटीची आस जीव झाला कासावीस,
कधी येते ही पंढरी जीवा पडेना उसास' ही भक्तीमय रचना सादर केली. राजकुमार मोरगे यांनी 'आषाढ महिना मृगाचा पाऊस पेरीचे दिवस बळीराजा ही शेतकऱ्या वरची अर्थपूर्ण कविता सादर केली.

विजय गुंडेकर यांनी 'नरकाच्या पल्याड देखण्या अशा बांधलेल्या बंगल्यातील रंगीबिरंगी चार भिंतीच्या आ-तही' ही दुःखद वास्तव चित्रण करणारी कविता सादर केली. समाधान लोणकर यांनी पावसाच्या ओल्या सरी चिंब करती मनामनाला अत्तराचा मधुगंध येतो मातीच्या कणाकणाला' ही कविता तर डॉ. निखिल नायक यांनी 'गाव तसं चांगल, चलती पाटिल अन् रावांची,ऐका ऐका हो कहानी, सवना या गावाची' ही शिक्षणाचे वास्तव चित्रण करणारी गोदाती काळे यांनी 'लेक.....!
लेक असते बापासाठी,त्याच्या काळजाचा तुकडा,
जाता घर सोडून, मनाचा होई पार सुकडा...!'
ही लेकी वरची डोळे पानावणारी कविता सादर केली.बालाजी शेळके यांनी 'पाऊस आला की राणी तुझी आठवण येते जणू हा पाऊस राणी तुझेच गीत गाते' ही प्रेम कविता तरडॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी 'आम्ही आता मोठे झालो, मोठमोठ्याहूनही मोठे झालो' ही उपहासात्मक कविता सादर केली. दिलीप धामणे यांनी 'तुझ्या नाजूक हास्यातदिसे दाणे डाळींबाचेनेसता हिरवा शालू जणू फूल सोनचाफ्याचे' ही प्रेमकविता सादर केली.

कवी संमेलनाच्या शेवटी नामदेवराव वाबळे यांनी मराठवाडा साहित्य परिषदे च्या विविध उपक्रमांची माहिती दिली तर अध्यक्षीय समारोपात अशोक अर्धापूरकर यांनी हिंगोलीतील भावी काळातील विविध साहित्यिक उपक्रमां विषयी तसेच कवी कालिदास यांच्या विषयी व सर्वांच्या कवितांविषयी भरभरून अभिप्राय दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथपाल संतोष ससे व कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले.

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# चैतन्यदायी मृद्गंध!



विरहिणी वसुंधरेला भेटायला कधी तो वाजत गाजत, ढोल ताशांसह, विजेच्या लखलखाटात येतो तर कधी आपला नेहमीचा शिरस्ता मोडून अगदी बेसावध क्षणी अवचित येतो. तो आल्याची वार्ता पंचमहाभूतांच्या साक्षीने तनमनाला मोहरते. त्याच्या त्या पहिल्या भेटीचा गंध सृष्टीवर आनंदाची दरवळ फुलवत नाचू लागतो. आता हिरवळ फुलण्याचे संकेत देण्यात तो सुगंध मश्गूल होतो. तप्त भेगाळलेल्या धरणीस, पाऊस केव्हाही, कसाही भेटायला आला तरी प्रीतगंध काही लपून राहत नाही. वेडे होतात सारे त्याच्या धुंद करणाऱ्या प्रसन्न गंधाने ! आहेच तो जादुई आनंद गंध खास! नव सृजनाचं गुपित दडलंय त्या सुगंधात! सूर्याच्या कोपाने मातीत लपून बसलेल्या असंख्य सूक्ष्मजीवांचा जणू जल्लोष असतो तो! आता नव्याने जीवनारंभ होणार म्हणून ते सूक्ष्मजीव वातावरण प्रमुदित करतात. मातीशी नाळ जोडून ठेवण्यासाठी मानवी मनाला साद घालतात. मग बालगोपाळ प्रतिसाद द्यायला पावसात भिजायला धावतात, चिखलामातीचे हलके लेपन होते, पावसाशी मैत्र दृढ होते. मग, मुलायम झालेल्या मातीचा मायाळू स्पर्श आनंदाचं निधान ठरतं... साऱ्यांसाठीच!

पहिला पाऊस पडला की, मातीच्या सुखद गंधाने आपण सारे सुखावून जातो. मृद्गंध हा ऋतू बदलाचा सूचक संदेश देत, वातावरण निर्मिती करतो. आल्हाददायी मृद्गंधी थंडावा तनमनाला पुलकित करतो, अशी ही उत्साहाची अत्तर कुपी काही नित्य उपलब्ध नसते. तरी आठवांच्या कोषात तिला बंदिस्त करून ठेवलं की, डोळे मिटून स्मरण कक्षात तिची अनुभूती नक्कीच घेता येते.

मृद्‌गंध म्हणजे विरहानंतर वरुण आणि धरतीच्या मिलनाचा संदेश! पावसाच्या पहिल्या सरींचा पुलकित करणारा स्नेह स्पर्श! वरुण आणि धरतीचा प्रीतबंध ! सृजनाची मधुर सरगम! उन्हाच्या झळांनी रखरखीत जमिनीवर पाण्याचे हळुवार केलेले शिंपण आणि त्याला धन्यवाद द्यायला सगळीकडे पसरलेला हा सुगंध! हे समीकरण नकळत आपल्याला उमगतं. काही कारणाने पहिल्या पावसानंतर वरुणराजाचं काहीतरी बिनसलं आणि सूर्य महाराज पुन्हा आग ओकू लागले की, या लडिवाळ गंधाचा लाभ पुन्हा नव्याने घेत अनुभवता येतो. एकदा का वरुण राजांचा दरबार नियमित भरू लागला की, धरणीचे घाव भरून येतात. मग मात्र पावसाचा जोर कितीही असला तरीही मृद्गंध भेटीस न येता दडी मारून बसतो अन् आपल्या आवडीची ही विशेष अत्तर कुपी पुढच्या वर्षीसाठी खास राखावी म्हणून चक्क भूमिगतच होते. आपल्या मन दालनात मात्र ती मुक्त संचार करीत प्रतिभेचे लेणे घडवत राहते.

जीवनाकडे रसिकतेने पाहणारे कवीमन या धुंद गंधाने जागृत होते. पाऊस अधिकच जीवलग वाटू लागतो. अनेक भावकोमल काव्यांची निर्मिती होते. नवरस काव्यात गुंफून घ्यायला आतुर होतात. एक वेगळीच आल्हाददायक प्रसन्नता मनभर व्यापून उरते. ऋतुचक्राच्या संगीताला एक सुमधुर लय मृद्गंधामुळे प्राप्त होते. मनातला आणि रानातला मोरही पिसारा फुलवून नाचू लागतो. सृष्टीच्या कॅनव्हासवर विहंगम दृश्य रेखाटलं जातं. वृक्षवेली आणि कातळांवरील धूळ धुतल्या जाते. ते देखणे रूप मन कोंदणात तसंच ठेवून द्यावंसं वाटते. अगदी बालवयात जेव्हा आपल्याला गंध म्हणजे काय हे ही कळत नसतं. तेव्हापासून या मृद्गंधाची मोहिनी पडते. बालपणी जेव्हा आपल्याला गंध म्हणजे काय? हे ही कळत नसतं तेव्हापासून या मृद्गंधाची मोहिनी पडते. ग्रीष्म काहिलीच्या साऱ्या खाणाखुणा अंगाखांद्यावर मिरवत असलेल्या उघड्या बोडक्या संन्यस्त भासणाऱ्या माळरानावर उभे राहून, पहिल्या पावसाचा आनंद घेण्याचं भाग्य तारुण्यात लाभलं की, रोमारोमात मृद्गंध भरून घेता येतो. अहाहा... श्वासश्वासात, रोमारोमात मृद्गंधाची धुंदी! सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात हा आनंद अल्पकाळ लाभतो. घराच्या दारंखिडक्या बंद असल्या तरी या निसर्गनिर्मित अत्तराचा सुगंध मनाच्या दारावर टकटक केल्याशिवाय राहत नाही. पंचेद्रियातील घ्राणेंद्रिय लगेच जागृत होतं. मन अंगणात पोहोचतं, खिडकीतून डोकावून त्याच्या आगमनाला मनभरून दाद दिली जाते. वय कोणतंही असो सगळी बंधन तोडून, त्याला भेटायला जावेच वाटतं. जो या सादेला प्रतिसाद देतो, त्याचं मन तरुणच राहतं.

मन मृद्गंधाने काठोकाठ भरले की, तो गंध हळूच लुप्त होतो. पण, तो येतो तेव्हा 'भुईवर हिरव्या स्वप्नांचं बीजारोपण करतोय बरं मी' असंच तर सांगायचं असतं ना या मृद्गंधास! तो सुवास हुंगायला फुलांच्या पाकळ्याही आतुर होऊन भूमीचरणी लोटांगण घेतात. मग काय...'गंधात गंध मिसळूनी, सुख स्वप्नांचे बांधूनी

दिमाखदार तोरण, अविस्मरणीय होतात क्षण' असं सांगायला विसरत नाहीत फुलंही!

संघर्षानंतर, दुःखाची झळ सोसल्यानंतर आनंदाचा काळ येतोच, हे सांगणारा हा मृद्गंध सर्वांना उल्हासित करून जातो.

***सरला उन्हाळा सरला,***
***नाही सोसायच्या तप्त झळा***
***सांगतो मृद्गंधी परिमळ,***
***आला आला पावसाळा***

## कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे / ९९७०६६३८१३

# गोष्ट एका रॅन्चोची !

इंस्टाग्रामवर वृक्षसंवर्धन टीम, पांढरगोटा हे नाव सर्च करता करता ओळख झाली एका अफलातून व्यक्तिमत्त्वाची! 'थ्री इडियट्स'मधील रॅन्चो या पात्राची आठवण व्हावी, असा हा हरहुन्नरी जिगरबाज व तितकंच अफलातून व्यक्तिमत्व लाभलेला रमाकांत शेंडे! इंजीनियरिंगचं शिक्षण घेतलेला २८ वर्षांचा हा तरुण सध्या एक यशस्वी उद्योजक आहे. वृक्षसंवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या कार्याने त्याला थेट पद्मश्री व पद्मभूषण अण्णा हजारे, पद्मश्री पोपटराव पवार, भास्कर पेरे पाटील यांच्याशी जोडलं.

'दुधाची पन्नी बांधणे ही साधी गोष्ट आहे पण, ती अशा प्रकारे बांधायची की थेंबभरही दूध वाया जायला नको. ही कला मला माझा मित्र निशांतने शिकवली. अनेक वेगवेगळे व्यवसाय केले. त्यात मला मित्रांची पुरेपूर साथ लाभली. वर्ष २०१८ मध्ये मी मोबाईल घेतला आणि सातच दिवसात नागपुरातील पहिली ऑनलाईन मिल्क सर्व्हिस सुरू केली. १४० रुपयांच्या



इन्वेस्टमेंटवर सुरू झालेला हा माझा पहिला बिझनेस! त्या आधी मी केटरिंगचे काम करायचो. मी आणि माझे काही मित्र राजवाडा पॅलेस, सातवचन लॉन अशा ठिकाणी केटरिंगचे काम करायला जात होतो. पैसे मिळवण्यासोबतच एक वेळचे जेवण वाचवणे हा आमचा उद्देश! पंधराशे रुपयात महिना काढावा लागायचा. कधी कधी जिथे लग्न असेल तिथे नवीन कपडे घालून जेवायला जायचं. कुठे वरात दिसली, फटाके फुटताना दिसले की, तयार होऊन जेवायला जाणे हा आमचा उद्योग! ऑनलाईन कपडे विकणे, भाजीपाला विकणे, घाणीचे तेल विकणे, शॉप टू शॉप केक विकणे, भारत पे चे ही काम मी केले. त्या काळात वोडाफोन ने एम पैसा म्हणून सुरू केला होता. मित्रांना घरून पैसे मागवायचे असल्यास एम पैसाद्वारे ते मागवणे. त्यातील पाच-दहा रुपये स्वतःकडे ठेवून बाकी त्यांना देणे, हाही एक बिझनेसच होता. या काळात मित्रांची भरपूर साथ लाभली. मंदार नावाच्या माझ्या एका मित्राने तर फक्त २७०० रुपयांत माझी वेबसाईट तयार करून दिली. एका मित्राबरोबर गीर गाईच्या तुपाचाही व्यवसाय केला.' अत्यंत बोलघेवडा व ढीगभर मित्र सोबत असलेला रमाकांत भरभरून आपल्या पूर्व आयुष्याविषयी बोलत होता. या यशस्वी उद्योजकाची कहाणी सुरू झाली ते जिल्हा व राज्य पातळीवर होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनांमधून! याच्या जैवविविधता या विषयावरील प्रोजेक्टला जिल्हा व राज्यस्तरावर अनेक बक्षिसं मिळाली. कुठल्याही विज्ञान प्रदर्शनात तो असेल तर बक्षीस पक्केच होते. इंजीनियरिंगला असताना त्याने सोलर एनर्जीचे प्रोजेक्ट बनवले. ते अनेकदा त्याच्या शिक्षकांद्वारे नाकारण्यात आले पण, प्रदर्शनामध्ये सर्वाधिक पुरस्कार याच प्रोजेक्टने प्राप्त केली. तेथून पांढरगोट्याच्या या सुपुत्राचे नाव प्रकाशझोतात आले.

'अनुभवासाठी मी सोलर कंपन्यांमध्येही काम केलं. भांडे प्लॉट चौकात जे सोलर ब्लिंक लाईट लागलेले आहेत, ते कसे तयार करायचे हेही काम मी केलं. नागपुरात सोलर वॉटर हीटरचे इन्स्पेक्शन मी केले. त्यावेळी, नागपुरात ३२७२ सोलर वॉटर हीटर लागले होते आणि त्या सगळ्यांची तपासणी मी केली होती,' रमाकांत हसत हसत सांगतो. कुही तालुक्यातील गोसे प्रकल्पग्रस्त पांढरगोटा या लहानशा पुनर्वसित गावातील प्रेमदास व बेबी शेंडे या शेतकरी दांपत्याच्या घरातील सविता, अस्मिता व करिष्मा या बहिणींपाठोपाठ झालेल्या या शेंडेफळाने कोरोना काळात तर कमालच केली. या पुनर्वसित गावात झाडे नावालाही नव्हती. तेव्हा यांनी वृक्ष संवर्धन टीम पांढरगोटा या नावाने एक ग्रुप तयार केला. गावातील शाळेच्या परिसरात फळझाडांची रोपे लावून त्यांना यशस्वीरित्या वाढवलं. त्यांच्या गावात कुणाकडेच मनरेगाचे कार्ड नव्हते. तेव्हा याने पुढाकार घेऊन गावातील अनेकांचे मनरेगा कार्ड तयार केले. पूर्वी त्या योजनेअंतर्गत फळझाडांची लागवड करण्यात येत नसे. परंतु, याच्या अथक प्रयत्नाने ९० प्रकारच्या प्रजातींची फळझाडे या योजनेअंतर्गत लावण्यात आली व त्यांचे संगोपनही केले. यातून अनेक व्यक्तींना रोजगाराचे साधन प्राप्त झाले.

'तुम्ही मला शंभर रुपये द्या, मी तुमच्या नावाने एक झाड लावतो! असे स्टेटस मी ठेवले होते. यातून सुमारे १७ हजार रुपये गोळा झाले. इतका आमच्या कामाला एक्सपोजर मिळाला. या झाडांनी आमच्या गावाला फेमस करून टाकलं. एकदा अहल्याबाई होळकर सभागृहाच्या उद्घाटनाकरिता पद्मश्री डॉ. विकास महात्मे सर येथे आलेले असताना मी त्यांना आमचा प्रोजेक्ट पाहायला चला, अशी गळ घातली. सुरुवातीला फक्त पाच मिनिटे थांबू, असे सांगणारे सर तासभर आमच्या गावात थांबले. त्यांना आमचा प्रोजेक्ट इतका आवडला की, त्यांनी आम्हाला झाडांना कंपाऊंड करण्याकरिता आठ लाख रुपयांचं अनुदान मंजूर केलं. संत गजानन संस्थेने ही आम्हाला या योजनेकरिता १०० झाडे दिलीत. अनेक आमदार, खासदार, श्री सत्यसाई सेवा संघटनेचे पदाधिकारी, सिंबायोसिस कॉलेजचे विद्यार्थी अशा अनेकांनी आमच्या गावाला भेट दिली आहे. आम्ही तर लग्नांमध्येही लोकांना गिफ्ट म्हणून रक्तचंदनाचे झाड द्यायचो. आता ती झाडे चांगली पाच पाच फुटांची झालेली आहेत,' रमाकांत भरभरून बोलत होता.

आपले हे कार्य अविरत सुरू राहिले पाहिजे या उद्देशाने या टीमने वृक्ष लागवड सप्ताह व गणेशोत्सव सुरू केला. या उत्सवांमध्ये दरवर्षी झाडे वाटप केली जातात. रमाकांतच्या याच कार्याची दखल अण्णा हजारेंच्या टीमने घेऊन त्यांना राळेगणसिद्धी येथे आमंत्रित केले. व्यवसाय देखील त्याने असा निवडला की, ज्यातून पर्यावरणाचं संवर्धन होईल. या कार्याची दखल घेऊन युवक बिरादरी संस्थेद्वारे त्याला मुंबईत प्रसिद्ध अभिनेते अभिषेक बच्चन, पद्मश्री क्रांती शाह, सचिन वाकुडकर,ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी या मान्यवरांच्या हस्ते वृक्ष संवर्धनाच्या क्षेत्रातील, कार्याकरिता हिरवे अंगण पुरस्कार देण्यात आला. दिल्ली येथे 'आझादी का अमृत महोत्सव'अंतर्गत घेण्यात आलेल्या 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमात कुही तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याकरिता रमाकांतची निवड करण्यात आली. त्यांनी पुढाकार घेऊन गावात वाचनालय सुरू केले. अनेक विद्यार्थी आज त्याचा लाभ घेत आहेत.

'मला इंजीनियरिंगचे शिक्षण पूर्ण करायला सात ते आठ वर्षे लागली. मी जर पास झालो असतो ना तीन वर्षात तर, कुठेतरी तीस-पस्तीस हजारांची नोकरी करत असतो. आज मी उद्योजक आहे. सतरा लोक माझ्या कंपनीत काम करतायत. याचं श्रेय माझ्या नापास होण्याला आहे. नापास झालो म्हणून मला वेगळे ऑप्शन ट्राय करायला वेळ मिळाला,' बोलता बोलता रमाकांतने बॉम्बच टाकला. अपयशाने खचून जाणाऱ्या नव्या पिढीला तुम्ही काय संदेश द्याल? असा माझा प्रश्न होता. परीक्षेत कमी मार्क मिळाले तर कित्येक हुशार मुले आपले जीवन संपवून टाकतात. अशा मुलांसाठी रमाकांत शेंडे हे एक आदर्श आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी शेतात राबणारे वडील व पाच ते सात किलोमीटर डोक्यावर भाजीपाला, तांदूळ व एका हातात रॉकेलची डबकी घेऊन जाणाऱ्या आईच्या मेहनतीचे चीज त्याने करून दाखवलं आहे. इतकेच नाही तर आपण आपल्या गावाचे, समाजाचे व निसर्गाचेही देणे लागतो या उद्देशातून निशांत, दीपक, रामेश्वर, हेमकृष्ण, प्रशांत, स्वप्निल, हरीश या मित्रांसह त्यांनी केलेले वृक्षसंवर्धनाचे कार्य अतुलनीय आहे.

त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा करीत, त्यांना पुढील भविष्यासाठी खूप शुभेच्छा देऊन नागपुरातील या रॅन्चोचा निरोप घेतला.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# उगवली शुक्राची चांदणी



लावणी ही महाराष्ट्रातील लोकप्रिय संगीताची एक शैली आहे. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लावणी! लावणी ही पारंपरिक गाणे आणि नृत्याचे संयोजन आहे. यात ढोलकी आणि तुणतुणं ही महत्त्वाची वाद्ये असतात. लावणी ढोलकीच्या शक्तिशाली लयीसाठी प्रसिद्ध आहे. ही गाणी खटकेबाज, प्रासयुक्त, गेय असतात. तेराव्या शतकापासून महाराष्ट्?ात लावणी अस्तित्वात असली तरी, पेशवाईमध्ये तिला वैभव प्राप्त झाले. भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या नृत्य शैली बघायला मिळतात.

लावणीचेही अनेक प्रकार आहेत. यात शाहिरी लावणी म्हणजे डफ, तुणतुणे यांच्या साथीने ही लावणी गायली जाते. ती अतिशय उच्च स्वरात गायली जाते. त्यांच्या संचात झिलकरी असतात. बैठकीची लावणी, यात गायिका/ नर्तिका बैठकीमध्ये लावणी सादर करतात. ती बैठकीवर बसूनच सादर केली जाते. सोबत तबला, पेटी, सारंगी अशी वाद्ये असतात. ही खाजगीत किंवा काही वेळेला निवडक प्रेक्षकांसमोर सादर केली जाते. तिला बैठकीची लावणी म्हणतात. यात मुद्राभिनय आवश्यक असतो.

लावणीचा आणखी एक प्रकार सांगता येईल, तो म्हणजे संगीत बारी लावणी! खाजगीत, छोट्या थिएटरमध्ये किंवा कनात लावून अथवा कापडी तंबूमध्ये सादर केली जाते. जिथे नृत्यांगना प्रेक्षकांनी सुचवलेल्या लावणीवर नृत्य सादर करतात. आणखी एक प्रकार म्हणजे फडाची लावणी! ही मोठ्या संख्येतील प्रेक्षकांसमोर सादर केली जाते. त्यात एखाद्या थिएटरसारखं वातावरण असतं पण, प्रेक्षकवर्ग मोठा असतो. यात प्रामुख्याने शृंगारिक लावण्या सादर केल्या जातात. ही लावणी सर्वांना ठाऊक आहे. उत्कृष्ट नृत्यांगना, त्यांची अदा आणि कला यातून सादर होते. त्यात त्यांचे सहकलाकार असतात. त्यात नाच्या आणि सोंगाड्या ही महत्त्वाची पात्रं असतात. एका प्रमुख नर्तिकेसोबत इतरही नर्तिका असतात. काही वेळा वादकाही या मंचावर उपस्थित असतात. ढोलकी आणि घुंगरू ही याची महत्वाची ओळख आहे. विशेषतः जत्रा-मेळा अशा ठिकाणी ही लावणी सादर होते.

अलीकडे आपण लावणीमध्ये स्त्री-पुरुष संबंध तसेच शृंगाराच्या विविध गोष्टी आलेल्या बघतो. पण, लावणी एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. पौराणिक, आधुनिक आणि इतर अनेक विषयांवरही लावण्यांची रचना झालेली दिसते. सामाजिक वास्तव हेही लावणीमध्ये रेखाटले जाते. काही भेदिक लावण्यांमध्ये कोडी, उखाणे, कलगीतुरा किंवा सवाल-जवाब असे दोन पक्ष घेऊनही रचली जाते. राम जोशी यांनी दुष्काळावर लावणी असावी किंवा अनंत फंदी यांनी बदलत्या काळाविषयी खंत लावणीतून व्यक्त करावी. यावरून लावणीच्या विषयाचा आवाका किती मोठा आहे, हे लक्षात येते. ढोलकी, हलगी, तुणतुणे, घुंगरू, झांज ही वाद्ये लावण्यांसाठी प्रमुख मानली जातात.

लावणी महाराष्ट्?ाची शान आहे. लावणीच्या माध्यमातून अनेक अदाकारांनी भल्याभल्यांना आपल्या पायातील घुंगरांच्या तालावर नाचवलेलं आहे. तमाशाच्या फडापासून ते ऑर्केस्ट्राच्या स्टेजपर्यंत, शाळेतल्या स्नेहसंमेलनापासून तर चित्रपटापर्यंत कुठेही लावणी सुरू झाली की, मराठी माणूस वेडा झालाच म्हणून समजा! गेल्या कित्येक वर्षांपासून लावणी महाराष्ट्?ातील लोकांचे मनोरंजन करीत आहे. सध्या ती देशातच नव्हे तर, विदेशातही पोचले आहे आणि अनेक विदेशी नृत्यांगना महाराष्ट्?ात येऊन लावणी नृत्याचे प्रशिक्षण घेत आहेत, अभ्यास करीत आहेत.

प्रारंभीच्या काळात लावणी फक्त गेय स्वरूपात ज्ञात होती. नृत्यप्रधान लावणी हे अलीकडच्या काळातील रूप आहे. जुन्नरी लावणी, हौद्याची लावणी, बालेघाटी लावणी, छक्कड, पंढरपूर बाज आणि कोल्हापूर बाज अशी लावण्यांची विविध रूपे आहेत. बालेघाटी लावणी ही रागदारी थाटाची, विलंबित लयीची लावणी होय. संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या सत्यभामाबाई पंढरपूरकर यांनी पंढरपुरी बाजाच्या लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. अलीकडच्या काळातील पद्म पुरस्कार विजेत्या सुलोचनाबाई चव्हाण यांचा आवाज आणि लावणी हे अद्वैत आहे, असं म्हटलं तर चुकीचं ठरू नये.

अनेक कवींनी उत्तम लावण्या लिहिल्या आहेत. त्यावेळी, लावणी लिहिताना बरीच पथ्ये पाळलेली असायची. लावणीमध्ये द्वयर्थ असेल पण, तोसुद्धा अतिशय संयत असायचा. रूपकांची योजना केलेली असली तरीही, ती रूपके एका ठराविक वयानंतरच कळायची. लहान मुलांवर त्याचा वाईट परिणाम होईल, असं नव्हतं. शिवाय, सादरीकरणातही चापून-चोपून नेसलेले नऊवारी लुगडे, अंबाडा असं घरंदाज रूप घेऊनच लावण्यवती नर्तिका ती लावणी सादर करीत असे. त्यामुळे, तिथेही एक मान होता, सन्मान होता. अगदी 'तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा' किंवा 'पाडाला पिकलाय आंबा' या लावण्या जरी घेतल्या तरीही कुठेही लेखनात अश्लील बाज दिसत नाही. आज मात्र लावणी म्हटली की, ती शृंगारिकच असायला हवी, असा एक नियम होऊ बघतो आहे. अर्थात व्यक्ती तितक्या प्रकृती असल्यामुळे कोणी कोणाला बंधन घालायचं? हा प्रश्नच आहे.

अनेक कवींनी लावणी लिहिली आहे, काही जण लिहीत आहेत. आपण काही नावे पुढे बघू या. यात काही अविस्मरणीय लावण्याही आहेत. काही गाजलेल्या लावण्या बघा.

१) दिसला गं बाई दिसला-चित्रपट पिंजरा-कवी जगदीश खेबुडकर- संगीतकार राम कदम आणि गायिका उषा मंगेशकर
२) उगवली शुक्राची चांदणी-चित्रपट दे धक्का-कवी श्रीरंग गोडबोले - संगीतकार अजय अतुल गायिका -आरती अंकलीकर
३) बाई मी पतंग उडवीत होते-कवी ग.दि. माडगूळकर- संगीतकार सुधीर फडके - गायिका आशा भोसले
४) बाई माझी करंगळी मोडली-चित्रपट पडछाया - कवी ग.दि.माडगूळकर - संगीतकार दत्ता डावजेकर - गायिका आशा भोसले
५) सोळावं वरीस धोक्याचं - चित्रपट सवाल माझा ऐका- कवी जगदीश खेबुडकर - संगीतकार वसंत पवार - गायिका सुलोचनाबाई चव्हाण
६) रेशमाच्या रेघांनी- चित्रपट मराठा तितुका मेळवावा- कवयित्री शांताबाई शेळके - संगीतकार आनंदघन - गायिका आशा भोसले
७) बुगडी माझी सांडली गं - चित्रपट सांगते ऐका- कवी ग.दि.माडगूळकर-संगीत राम कदम- गायिका आशा भोसले
८ ) पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा- चित्रपट कलावंतीण - कवी जगदीश खेबुडकर - संगीतकार राम कदम- गायिका शोभा गुर्टू

त्यावेळचे चित्रपट हे लावणीप्रधान होतेच. किंबहुना, तत्कालीन राजकारण गावकारण त्यात असल्याने लावणी हा चित्रपटाचा अविभाज्य भाग असायचा. आपण कृष्णधवल मराठी चित्रपट जर आठवले तर, याचा आपल्याला प्रत्यय येईल.

**चित्रपटांशिवायच्या लावण्या:**

१) खेळताना रंग बाई होळीचा-कवी यादवराव रोकडे-संगीतकार विठ्ठल चव्हाण- गायिका सुलोचनाबाई चव्हाण
२) कळीदार कपुरी पान- कवी राजा बढे- संगीतकार श्रीनिवास खळे- गायिका सुलोचनाबाई चव्हाण

मराठीला एक लावण्याचं देणं दिलेली ही लावणी मराठीचे साहित्य समृद्ध करून गेलेली आहे. लावणीमध्येही एक ध्रुवपद आणि त्यानंतर दोन, तीन, चार अंतरे अशी याची रचना असते. गीताच्या सगळ्याच कसोट्यांवर लावणीसुद्धा उतरायलाच हवी असते. तसं जर नसेल तर ती लावणी मनामध्ये रुजून बसत नाही. जी कवी मंडळी आहे, त्यांनी जुनं लावणी साहित्य वाचावं. त्याचा अभ्यास करावा आणि आपल्या लेखणीला एक नजाकत देऊन नंतर लावणी लिहिण्याचा प्रयत्न करावा आणि आणखी एक सुवर्णयोग-अभिजात मराठीच्या दालनात आणावा, एवढीच विनंती पुढे आपण भेटणारच आहोत. एक वेगळा विषय घेऊन! सध्या एक सर्वांची आवडती लावणी...

***अडवू नका मज सोडा आता पुरं झालं ना धनी***
***उगवली शुक्राची चांदणी ॥धृ॥***

***निरव शांतता अवतीभवती***
***रातकीडं हे किरकिर करती***
***भिरभिर करती वर पागोळ्या***
***धडधड होते उरी***
***उगवली शुक्राची चांदणी ॥१॥***
***लवलव करिती हिरवी पाती***
***चमचमणाऱ्या चांदण राती***
***वाऱ्यावरती गंध दरवळे***
***केतकीच्या या बनी***
***उगवली शुक्राची चांदणी ॥२॥***

# राजकुमारी रत्नावती

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१



साधारणतः ही घटना चौदाशेच्या सुरुवातीच्या दशकाची! दिल्लीवर अल्लाउद्दीन खिलजी हा स्वतःला दुसरा सिकंदर म्हणवणारा सुलतान राज्य करीत होता. ज्या काकाने त्याला बालपणापासून सांभाळलं होतं त्याचाच खून करून, अल्लाउद्दीनने दिल्लीची सत्ता हस्तगत केली होती. अत्यंत महत्वाकांक्षी असलेल्या या सुलतानाने राज्यविस्तार हे ध्येय ठेवून, राजपूतान्याकडे आपली पावलं वळवली. एकेक प्रदेश पादाक्रांत करीत, तो पुढे निघाला होता. राजपुतान्यातील सशक्त किल्ल्याकडे त्याची नजर वळली होती. सर्वप्रथम रणथंबोर मग चितोड आणि आता जैसलमेर! प्रचंड सैन्यासहित त्याने आपला सेनापती मलिक काफूर याला जैसलमेर जिंकण्यासाठी पाठवलं. यावेळेस इथे रावल रतन सिंहांचं राज्य होतं. रत्नावती ही त्याची अत्यंत रुपवती, पराक्रमी, शूर आणि बुद्धीमान सहृदयी लेक! जैसलमेरचा किल्ला बलाढ्य होता. हा किल्ला तिने किती प्राणपणाने आणि हुशारीने लढवला, त्याचीच ही गाथा!

मलिक काफूरने आपल्या सैन्यासहित त्या किल्ल्याला चारही बाजूने वेढा दिला. रावल रतन सिंह स्वतः मलिक काफूरला परास्त करण्यासाठी किल्ल्याबाहेर पडले. पण, त्यांनी जातांना किल्ल्याची जबाबदारी, आपली पुत्री रत्नावती हिच्यावर सोपवली आणि तिनेही पित्याला वचन दिलं की, ती किल्ला प्राणप्रणाने लढवेल. नि:शंक होऊन ते किल्ल्याबाहेर पडले. आता किल्ल्याची संपूर्ण जबाबदारी राजकुमारी रत्नावतीवर होती. आपल्या सैन्याला प्रोत्साहित करणं, त्यांना लढण्यासाठी उत्तेजन देणं, त्यांचं मनोबल खचू न देणं ही जबाबदारी तिने पूर्णतः आणि योग्यरित्या सांभाळली होती. तिने मर्दानी वेष धारण केला आणि सर्व बुरुजांवर जाऊन परिस्थिती कशी आहे? हे ती वारंवार न्याहाळत होती. किल्ला चहूबाजूंनी अल्लाउद्दीनच्या सैन्यांनी वेढलेला होता. तरीसुद्धा ती ना भयभीत झाली ना हरली!

जैसलमेर किल्ला जिंकणं अतिशय अवघड आहे, हे मलिक काफूरच्या लक्षात आलं. आता अशी चाल खेळायची की, ज्याने किल्ला सहज आपल्या हातात पडेल, या दृष्टीने मलिक काफूरने किल्ल्याच्या द्वारपालाशी संधान साधलं. त्याला पैशाचं आणि वतनाचं आमिषही दाखवलं. जेणेकरून तो आपल्या बाजूने वळून, आपल्याला किल्ल्यात सहज प्रवेश मिळेल. पण, हा द्वारपाल अतिशय प्रामाणिक आणि राजकुमारीचा अत्यंत विश्वासू असल्यामुळे त्याने ही गोष्ट राजकुमारीच्या नजरेस आणून दिली. या संधीचा फायदा घेण्याचं तिने ठरवलं. द्वारपालाला एक संदेश रवाना केला की, मध्यरात्री किल्ल्याचे द्वार तू उघडून ठेव. त्यानुसार, द्वारपालाने मध्यरात्री किल्ल्याचं दार उघडलं. दार उघडताच मलिक काफूर आणि त्याचे शंभर सैनिक किल्ल्यात शिरले. राजकुमारीने सैनिकांना त्यांना बंदी बनवण्याचा आदेश दिला.

मलिक काफूर आणि त्याचं सैन्य बंदी झाल्याची वार्ता ऐकताच मुगल सैनिकांनी किल्ल्याचा वेढा अधिक घट्ट केला. त्यामुळे किल्ल्यातून ना कोणी बाहेर पडू शकत होतं ना कोणी आत येऊ शकत होतं. किल्ल्यात येणारी रसद बंद झाली. सैनिकांसह राजकुमारीला उपवास घडू लागले होते. उपासमारीच्या या कठीण प्रसंगीसुद्धा तिने आपल्या सैनिकांना एक मूठभर अन्न आणि मुगल सैनिकांना दोन मुठी अन्न देण्याचा निर्णय घेतला आणि उत्तम राजधर्म पाळला.

आपल्या सैनिकांना व सेनापतीला किल्ल्यावर बंदिस्त करून ठेवले, ही वार्ता कळताच अल्लाउद्दीन खिलजी अस्वस्थ झाला. किल्ला आपण या परिस्थितीत जिंकू शकणार नाही, याची त्याला जाणीव झाली. आता संधीशिवाय पर्याय नव्हता. त्यांनी रावल रतन सिंहांकडे संधीचा प्रस्ताव पाठवला. राजकुमारी किल्ल्यावरून आजूबाजूच्या परिस्थितीचं अवलोकन करीत होती आणि तिच्या लक्षात आलं की, मुघल सेना आपले तंबू आणि डेरे काढून परतीच्या मार्गावर निघाली आहे. रावल रतन सिंह आपल्या सैनिकांसह किल्ल्याकडे परत येताहेत. म्हणजे किल्ल्याचा वेढा निघाला होता. तिने मलिक काफूर आणि मुगल सैन्याला मुक्त केलं.

मलिक काफूर तिच्या या औदार्याने भारावला होता. अशी ही राजकुमारी रत्नावती! जैसलमेरचा किल्ला तर तिने लढवलाच पण त्यासोबत आपल्या सहृदयतेचं एक उत्तम उदाहरण तिने सर्वांसमोर घालून दिलं. या वीरांगना भारतभूचा सन्मान आहेत.

# नांदेडमध्ये समरसता साहित्य संमेलनाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जून -**

समरसता साहित्य परिषद महाराष्ट्राच्या वतीने २० वे समरसता साहित्य संमेलन नांदेड येथे २ व ३ ऑगस्ट २०२५ रोजी भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. हे संमेलन श्री गुरुगोविंदसिंघजी साहित्यनगरी, भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, नांदेड येथे होणार असून, याची माहिती स्वागताध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या संमेलनाच्या अध्यक्षपदी पद्मश्री नामदेव चं. कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. नामदेव कांबळे हे ज्येष्ठ साहित्यिक, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व 'राघववेळ' या गाजलेल्या कादंबरीचे लेखक आहेत.

संमेलनाचे उद्घाटन वंदनीय भदंत डॉ. राहूल बोधी महाथेरो (अध्यक्ष, ऑल इंडिया भिक्खू महासंघ) यांच्या शुभहस्ते होणार आहे. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. किशोर मकवाणा (अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, भारत सरकार) हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाच्या संयोजनासाठी विविध पदाधिकाऱ्यांचे योगदान असून, कार्यवाह माणिक भोसले, निमंत्रक शिवा कांबळे, सहनिमंत्रक डॉ. माया गायकवाड, प्रा. डॉ. धनंजय भिसे, डॉ. राजेश कापसे, महाव्यवस्थापक अभय कोटलवार, सहव्यवस्थापक राजेश मांजरमकर हे परिश्रमपूर्वक नियोजन करत आहेत. संमेलन यशस्वी व्हावे यासाठी विविध समित्याही गठित करण्यात आल्या आहेत.

या संमेलनात शहरातून भव्य ग्रंथदिंडीचे आयोजन होणार असून, उद्घाटक व अध्यक्ष यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान, विविध परिसंवाद, साहित्यिक संवाद, मुलाखती, विद्यार्थी वक्त्यांचे ग्रंथपरिचय सत्र, कविसंमेलन, खुला काव्यमंच, गझल मंच तसेच रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम यांचा मनोहारी संगम अनुभवता येणार आहे. संमेलनस्थळी भव्य ग्रंथ प्रदर्शन व विक्री केंद्र देखील उभारण्यात येणार आहे.

सुमारे ६०० हून अधिक साहित्यिक, लेखक, कवी, विचारवंत व साहित्यरसिक महाराष्ट्रभरातून या संमेलनात सहभागी होणार आहेत. समरसता साहित्य परिषदेने गेल्या अनेक वर्षांत समतावादी, मूल्याधिष्ठित व सामाजिक प्रश्नांना स्पर्श करणाऱ्या विचारप्रधान साहित्य परंपरेची जपणूक केली आहे. हीच परंपरा पुढे नेणाऱ्या या २० व्या संमेलनाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी संपूर्ण नांदेड शहर आणि साहित्यप्रेमी सज्ज झाले आहेत. नांदेडकरांसाठी ही एक संस्मरणीय साहित्यिक व सांस्कृतिक पर्वणी ठरणार आहे अशी माहितीही संमेलनाचे स्वागताध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे यांनी यावेळी दिली.

# शहरातील मोकाट जनावरांचा त्वरित बंदोबस्त करा: हजारी



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२९ जून -**

प्रसिद्ध तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र माहूरगड याठिकाणी दररोज हजारोंच्या संख्येने देवदर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक व पर्यटक येतात त्यांना गडावर जाण्यासाठी शहरातील एकमेव मुख्य रस्ता म्हणजे राष्ट्रीय महामार्ग असून,हा रस्ता नेहमी पादचाऱ्यांसह वाहनांच्या वाहतूकीने प्रचंड प्रमाणात गजबजलेला असतो. मात्र हल्ली हा रस्ता मोकाट जनावरांच्या मुक्त संचारासह त्यांचा विश्रामगड बनला असल्याने वाहतूकीस प्रचंड अडथळा निर्माण होत असून, मोठ्या अपघाताला निमंत्रण देत असल्याने या मोकाट जनावरांचा नगरपंचायत प्रशासनाने तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी उर्फ राणा यांनी युवासेना जिल्हाप्रमुख संदेश पाटील हडसणीकर, शिवसेना तालुका प्रमुख सुदर्शन नाईक व युवासेना तालुका प्रमुख सोनू चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदनाद्वारे मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्या कडे बुधवार २५ जून रोजी केली आहे.

श्री क्षेत्र माहुरगड़ हे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक प्रसिद्ध तीर्थ क्षेत्र असून येथे मोठ्या प्रमाणात भाविक देवदर्शनासाठी येत असतात. परंतु, शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर मोकाट जनावरांचा मुक्त संचार सुरू असतो. तर अनेक गाई, म्हशी, बकऱ्या व इतर प्राणी हे रस्त्याच्या मधोमध बस्तान मांडून बसून राहत वाहतूकीस अडथळा निर्माण करत असल्याने यामार्गावरुन येनाऱ्याजाणाऱ्या भाविकांच्या वाहनांसह , प्रवाशांना व पादचाऱ्यांना यामुळे प्रचंड अडथळा निर्माण होऊन, नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे लहान मोठे अपघात होने ही नित्याचीच बाब झाली असून,एखादी मोठी अपघाताची दुर्घटनाही घडू शकते हे नाकारता येत नाही.

जेव्हा कि , शासनाने गोमाता गाईला राज्य मातेचा दर्जा दिलेला आहे. आणि म्हणून राज्य मातेचा कुठेही कसल्याही प्रकारचा अपमान होऊ नये व त्यांना दुखापत होऊ नये तसेच अपघाताची कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या करिता,

माहुर नगरपंचायत प्रशासनाला माहूर शहरवासियांच्यावतीने शहर युवासेनेतर्फे नम्र सूचना वजा विनंती करत लेखी निवेदन देण्यात आले असून,या गंभीर विषयी तातडीने उचित उपाययोजना करुन मोकाट जनावरांचा महामार्गावरील वावर थांबवून योग्य तो बंदोबस्त करावा अन्यथा, माहूर शहर युवा सेनेतर्फे माहूर नगरपंचायत समोर लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्यात येईल ,असा इशाराही सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी युवा सेना शहर प्रमुख, राणा उर्फ विजयसिंह हजारी, साई नार्लावार, मनिष सोनकुसरे,यश शेवाळे, योगेश माळवे, समाधान पाऊलबुद्धे, नकुल पस्पुलवार, प्रथमेश श्रीपतवार ,शिव सोनूने यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### बितनाळ पदोन्नती मुख्याध्याक शेख मौला यांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळा

**उमरी** -तालुक्यातील केद्रियं जिल्हा परिषद शाळेचे पदोन्नती मुख्याध्यापक शेख मौला शेख फरीद प्रदिर्घ सेवेनंतर सेवा निवृत झाले असुन त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा दि २७ जून २०२५ रोजी करण्यात आला आहे . शेख मौला शेख फरीद पदोन्नती मुख्याध्यापक हे दि . २२ सप्टेबर १९८६ शिक्षक म्हणून रूजू झाले . यापुर्वी के प्रा शाळा बितनाळ येथे १५ वर्ष शिक्षक म्हणून सेवा केली त्यानंतर त्यांना बाहेर गावी जिल्हा परिषद शाळेत कर्तव्य बजावून परत बितनाळ येथेच पदोन्नती मुख्याधापक म्हणून आले आणि प्रदीर्घ सेवेनंतर वयाच्या ३८ वर्ष ९ महिने सेवा करून सेवानिवृत्त झाले आहेत सेवानिवृत सन्मान सोहळ्यात शेख मौला त्यांच्या पत्नी गौसियाबी शेख मौला सह परिवाराचा बिसनाळ जि . प . शाळेच्या वतिने मोठ्या प्रमाणात सत्कार सन्मान करण्यात आला आहे . या सन्मान सोहळ्यात सेवानिवृत पदोन्नती मुख्याध्यापक शेख मौला यांनी गावातील नागरीकांचा व वरिष्ट अधिकारी आणि सहकारी शिक्षक यांच्या सहकार्य लाभले म्हणून गैहिवरले असुन त्यांना अश्रू अनावर झाले आहेत हा क्षण मी कधी विसरू शकत नाही असे बोलत शेख मौला यांनी विशेषता मुख्याध्यापक भगवान संपतवार यांचा माझ्या पाठीमागे आशीर्वादाचा सिंहाचा वाटा मला लाभला असे सांगून उपस्थित मानवराचे आभार मानले आहेत. यावेळी उपस्थित उमरी गट शिक्षणाधिकारी , मुधोळकर,विस्तार अधिकारी शंकर बेळकोने ,केंद्रप्रमुख चाटोरिकर, छत्रपती महाराज हायस्कुल चे मुख्याध्यापक बी.डी कदम ,सरपंच प्र मारोती उमाटे, माजी सरपंच प्र मारोतराव वाघमारे, उपसरपंच प्र देविदास अकमवाड ,नागनाथ घुमलवाड , गणेशराव अन्येमवाड , गणेश कोंडवाड , गंगाधर लगादिवे , सेकेट्री दतराम पा सुर्यवंशी पांडूरंग मंतलवा , पिराजी जिडेवाड , विठ्ठल कानगुलकर , सुधाकर सुर्यवंशी किशोर लोखंडे ,बितनाळ केंद्रातील शिक्षकवृंद गावातील प्रतिष्ठित गावकरी नागरीक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन शिक्षक लक्ष्मण वडमिले यांनी केले तर आभार मुख्याध्यापक भगवान संपतवार यांनी मानले आहेत .

### शांताबाई जयराम सोनटक्के प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड**-कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको नवीन नांदेड येथील शांताबाई जयराम सोनटक्के ह्या ३१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. कुसुमताई



माध्यमिक विद्यालय सिडको नवीन नांदेड येथील शांताबाई जयराम सोनटक्के या सेवक पदावर दिनांक १९ जून १९७४ रोजी रुजू झाल्या होत्या आज रोजी नियतवयोमानाने दिनांक ३० जून २०२५ रोजी ३१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. शांताबाई सोनटक्के यांची कुसुमताई माध्यमिक विद्यालयाच्या जडणघडणांमध्ये सिंहाचा वाटा आहे त्यांनी आपल्या कारकिर्दीत शाळेसाठी लागणारी मुले सिडको परिसरातील काकांडी, मुजामपेठ, धनेगाव, सिडको, हडको परिसरातून मुले आणून शाळेतील मुलांची संख्या वाढविण्या यांचे मोठे योगदान आहे. शांताबाई सोनटक्के सेवानिवृत्त झाल्याबद्दल संस्थेचे सचिव संभाजी बिरादार व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शशिकलाताई जाधव यांच्या सह कुसुमताई प्राथमिक व माध्यमिक विद्यालय यांनी सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्काराचे आयोजन केले आहे.

### दत्ता गड्डुलवाड उर्फ नागपुत्र यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार



**इस्लापूर** - फुले आंबेडकरी चळवळीतील दलित पँथर से ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ता गड्डुलवाड उर्फ( नागपुत्र)यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स कडून त्यांच्या आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरूस्काराने सन्मानित करण्यात आला, हा पुरस्कार छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या अवचित वर गुरुवारी ता .२६ रोजी सिडको नवीन नांदेड येथील रुबी हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात पँथर नेते रमेश भाऊ खंडागळे यांच्या उपस्थितीत देण्यात आल्याची माहिती मिळाली . दत्ता गडुलवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा मित्र मंडळा तर्फे ईस्लापूर येथील शासकीय विश्रामगृहात शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला . त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते जगदीप हानवते ,निर्गुण पाटील हुडीकर हिरामण शेळके, नितीन शेळके, प्रमोद जाधव , आदी मित्र मंडळाने त्यांचे अभिनंदन केले . विशेष म्हणजे या पुरस्कारासह त्यांच्या कारकिर्दीमुळे त्यांना एकूण बारा पुरस्कार मिळाल्याची माहिती त्यांनी दिली .

# अभ्यासात सातत्य ठेवा, यश मिळेल : पो.नि. जगन पवार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जून -**

विद्यार्थ्यांनी आपला धर्म केवळ अभ्यास करणे, हा ठेवायला हवा. खडतर प्रवास करण्याची क्षमता आणि अभ्यासात सातत्य ठेवले तर कोणत्याही स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवता येते, असे प्रतिपादन इतवारा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन पवार यांनी केले.

समृद्ध जीवन प्रतिष्ठान नांदेड, बार्टी व टर्टी पुणे यांच्या मार्फत मोफत पोलीस सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण दिले जाते. यांच्या वतीने स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले, चंद्रमनी धुतराज, डॉ. सिद्धोधन एडके, इंजि. प्रवीण खंदारे, अविनाश राठोड, अशोक कावडे, हर्षद कुरवारे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना पोलीस निरीक्षक जगन पवार म्हणाले की, कुठलेही यश सहजासहजी मिळत नसते. त्यामुळे कठोर परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. असे सांगीतले

आभार प्रदर्शन १चंद्रमनी धुतराज यांनी केले.

# स्वच्छतेच्या राज्यस्तरीय अभियानात छत्रपती शिवाजी हायस्कूलचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**सगरोळी, दि.२९ जून -**

स्वच्छता हीच सेवा या भावनेतून राज्यभरात राबवण्यात आलेल्या गांधी तीर्थ स्वच्छ शाळा या प्रतिष्ठित राज्यस्तरीय अभियानात सगरोळीच्या छत्रपती शिवाजी हायस्कूल ने उल्लेखनीय कामगिरी करत आपला ठसा उमटवला आहे. स्वच्छ शाळा, प्लास्टिकमुक्त परिसर आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाच्या निकषांवर आधारित या स्पर्धेत राज्यातील ३५४ शाळांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी ( जि.नांदेड) संचलित छत्रपती शिवाजी हायस्कूलची अंतिम फेरीसाठी निवड झाली. विशेष म्हणजे, शाळेच्या स्वच्छता उपक्रम, शालेय परिसरातील प्लास्टिक निर्मूलन, विद्यार्थ्यांचे प्रबोधन आणि श्रमदानाच्या माध्यमातून या शाळेने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

राज्यस्तरीय अंतिम फेरीत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शाळेला सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि ३१,०००/- (एकतीस हजार रुपये) धनादेश देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान शाळेच्या वतीने मुख्याध्यापक संभाजी गायकवाड व कैलास कोदळे यांनी स्वीकारला.

पुरस्कार वितरण समारंभात सागरमित्र अभियानाचे सहसंस्थापक विनोद बोधनकर, जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल, राज्य सल्लागार परिषद व ठढए समितीचे सदस्य अनिल बोरनारे आणि गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त व जैन इरिगेशन सिस्टिम्सचे अध्यक्ष डॉ. अशोक जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

कस्तुरबा गांधी सभागृह, जळगाव येथे २९ जून रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात सगरोळीच्या शाळेच्या कामगिरीचं सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण संरक्षण, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करणे आणि प्लास्टिकमुक्त शाळा परिसर घडवण्याच्या दृष्टीने सगरोळीच्या शिवाजी हायस्कूलने घेतलेला पुढाकार आता इतर शाळांसाठी प्रेरणा ठरत आहे.

स्वच्छ भारत मिशनच्या उद्दिष्टांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, सगरोळीच्या छत्रपती शिवाजी हायस्कूलने त्याचा आदर्श ठेवला आहे, असे मत कार्यक्रमातील मान्यवरांनी व्यक्त केले.

# पशु चिकित्सा व्यवसायी संघटनेच्या कोषाध्यक्षपदी डॉ. लक्ष्मण सनकाडे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जून -**

पशु चिकित्सा व्यवसायी संघटनेच्या नांदेड जिल्हा कोषाध्यक्षपदी डॉ. लक्ष्मण सनकाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संघटनेचे राज्यसचिव डॉ. एन. पी. कानोले यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९ जून रोजी पार पडलेल्या बैठकीत पशु चिकित्सा व्यवसायी संघटनेची नांदेड जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यात अध्यक्षपदी डॉ. राहुल चव्हाण, उपाध्यक्षपदी डॉ. दीपक जाधव, कोषाध्यक्षपदी डॉ. लक्ष्मण सनकाडे, सचिवपदी डॉ. शिवप्रसाद तेलंनवार, महिला उपाध्यक्षपदी डॉ. छाया सूर्यवंशी तसेच डॉ. पार्वती वाघमारे यांची निवड करण्यात आली.

या बैठकीस डॉ. श्रीनिवास इंगोले, डॉ. शिवाजी डाकोरे, अंजना जमदाडे, डॉ. सुमेध बनसोडे, डॉ. डी.बी. इंगळे, डॉ. अजगर , डॉ. बी. एम. ढगे, डॉ.पुजारी, डॉ. मेंढेवार, डॉ. वाघमारे, डॉ. डी. डी. गायकवाड, डॉ. एन. जी. कल्याणकर, डॉ. पवार यांची उपस्थिती होती.

डॉ. लक्ष्मण सनकाडे यांची निवड झाल्याबद्दल सुरेश काशिदे, अविनाश चमकुरे, यशपाल भोसले, रघुनाथ पोतरे, विलास आडे, कुवरचंद मंडले, प्रशांत गवळे, अर्जुन राठोड, हैदर अली, सुरेश आंबटवार, सचिन कावडे, नारायण गायकवाड, कमलाकर बिरादार, प्रदिप घुगे, दिपंकर बावस्कर, दिनेश येरेकर, दिनेश मुधोळकर, प्रविण देशमुख आदीसह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# लोहा तालुक्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२९ जून -**

तालुक्यातील ११८ ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदाची आरक्षण सोडत १ जुलै रोजी दुपारी तीन वाजता तहसील कार्यालयात होणार आहे. तेव्हा या आरक्षण सोडत होताना तालुक्यातील सरपंच उपसरपंच सदस्य, व नागरिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे

तालुक्यातील ११८ ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदाचे २०२५ ते २०३० पर्यत मुंबई ग्रामपंचायत (सरपंच उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ चे कलम ५ मधील तरतुदी नुसार आरक्षण निश्चित करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आदेशीत केले आहे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २७ टक्के ओबीसी आरक्षणामुळे नव्याने सोडत काढली जाणार आहे. तालुक्यातील ११८ ग्रामपंचायत मध्ये अनुसूचित जाती (एससी) साठी २० ग्रामपंचायत त्यात १० महिलांसाठी राखीव असतील. अनुसूचित जमाती (एसटी) साठी दोन त्यात एक ग्रामपंचायत महिला साठी आरक्षित असेल. नागरिकांचा मागास प्रवर्ग

(ओबीसी) साठी ३२ ग्रामपंचायत असून त्यात १६ ग्रामपंचायत या ओबीसी महिला सरपंच पदासाठी राहणार आहेत. खुल्या प्रवर्गासाठी ६४ ग्रामपंचायत असून त्यात ३२ महिलांसाठी राखीव असतील असे आरक्षण आहे १जुलै रोजी दुपारी तीन वाजता तहसीलदार विठ्ठल परळीकर याच्या उपस्थितीत सरपंच पदाचे गावनिहाय आरक्षण सोडत काढले जाणार आहे. हे २०२५ ते २०३०या पाच वर्षात होणाऱ्या ग्रामपंचायत साठी लागून राहणार आहे. या आरक्षण सोडतीसाठी तालुक्यातील सरपंच उपसरपंच सदस्य, नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले.

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.२९ जून -**

येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ.विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली छ. राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. .या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. बिडवे आर.एम. हे उपस्थित होते.

# प्रा.राहुल मांडणीकर यांना 'प्रोफेसर'पदवी बहाल

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२९ जून -**

नायगांव तालुक्यातील मांडणी गावचे सुपुत्र प्रा. राहुल दत्ता मांडणीकर यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून 'प्रोफेसर' ही पदवी नुकती च बहाल करण्यात२२ आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशा बद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

प्रा. मांडणीकर हे गेल्या १७ वर्षांपासून कोल्हापूर येथील छत्रपती शहाजी महाविद्यालयात राज्य शास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांनी या कालावधीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रांमध्ये शोधनिबंध सादर करत विद्वत्तेची चुणूक दाखवली आहे. याशिवाय, सध्या ते महा विद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी

# हाणेगाव येथील वार्ड क्रमांक दोनकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष



**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि.२९ जून -**

देगलुर तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून हाणेगावला पाहीले जाते पण विकासाच्या बाबतीत मात्र सर्वात छोटी आहे कारण की १७ सदस्यीय ग्रामपंचायतीत ६ वार्ड असुन त्यात वार्ड क्रमांक २ मध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असुन मोठा क्षेत्रफळाचा परीसर असल्यामुळे लोकवस्ती मोठी आहे पण गल्लीत जाण्यासाठी व्यवस्थीत रस्तेच नाहीत वर्षाला पावसाळ्यात या रस्त्यावर मुरुम गोटा टाकुन तोंड पुसण्याचा काम बरेच वर्षापासुन चालु आहे जवळजवळ पंचवार्षीक कार्यकालच संपला पण रस्ते नाली काही बनले नाहीत म्हणुन लोकांचा रोष वाढत आहे मतदार लोकप्रतिनिधीवर विश्वास ठेऊन मतदान करतात पण प्रतिनिधी विश्वास घात करत असेल तर मतदान द्यावा तरी कोनाला असा प्रश्न नागरीकांना पडला आहे. केंद्र शासनाचा राज्य शासनाचा भरपुर निधी ग्रामपंचायतीला येत असताना रस्तेच होत नसेल तर निधी चालला कुठे असा देखील प्रश्न नागरीकांना पडला आहे .सरकारी दवाखान्या समोरील भागात विशेष करुन या वार्डात शेतकरी मजुरकार यांचा जास्त भरणा आहे याच परीसरात विद्युत् वितरण कंपनी,यशोदीप इंग्लीश स्कुल,बालवाड्या आहेत,गावात मोठा परीसर म्हणुन याला बघीतले जाते येथील लोकांना लागतो काय रोड नाली पाणी विज हेच नसतील तर विकास कसला म्हणुन संबंधीत ग्रामपंचायतीने याकडे लक्ष देऊन सि सी रस्ते बनवुन द्यावे अशी मागणी स्थानीक नागरीकातुन होत आहे.

# खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या पाठपुराव्यास यश

## हदगाव शहर विकासासाठी चार कोटी चा निधी मंजूर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२९ जून -**

हदगांव शहरातील रस्ते विकास,नाली बांधकाम यासाठी व स्वामी समर्थ महाराज मंदिर सभामंडप, लिंगायत समाज स्मशान भूमी विकास व भाई बन्सीलाल तोष्णीवाल स्मारक वाचनालय परिसरात गार्डन विकसित करणे या कामासाठी खा. नागेश पाटील यांच्या मागणी नुसार राज्य शासनाने चार कोटी चा निधी मंजूर झाला असून लवकरच सर्व कामाचे भूमिपूजन होणार आहे.



मागील वर्षी १८ डिसेंबर ला खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी हदगांव शहरांत रस्ते विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन तर अर्थ मंत्री अजित पवार यांना भेटून तरतूद देण्यासाठी विनंती केली होती त्या नंतर याच कामासाठी सतत पाठपुरावा त्यानी केला होता त्याला अखेर यश प्राप्त झाले असून विशेष रस्ते अनुदान योजनेतून ११ विविध रस्त्याच्या कामासाठी २ कोटी तर वैशिष्ट्य पुर्ण योजनेअंतर्गत २ कोटी च्या कामाना शासनाने मंजुरी दिली असून यात हदगांव शहरात तट्टा कॉलनी मधील भाविकांचे श्रद्धास्थांन असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिराच्या बाजूला एक कोटी रुपयाचे भव्य दिव्य सभामंडप होणार आहे

तर लिंगायत समाज स्मशान भूमी मध्ये निवारा शेड, पाणीपुरवठा व्यवस्था,सुरक्षा भिंत बांधकामं करण्यात येणार असून या साठी पन्नास लाख रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. भाई बन्सीलाल तोष्णीवाल स्मारक वाचनालय परिसरात बगीचा व वृक्षारोपण कामासाठी सुद्धा पन्नास लाख रुपये मंजुरी झाली आहे. तर हदगाव शहरातील विविध वार्डात रस्ते व नाली बांधकाम करणे यासाठी एकूण दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती प्राप्त झाली असून यामुळे हदगाव शहरातील नागरिकांवरती खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे प्रेम अद्यापही कायम असल्याचे अधोरेखित होत आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शिवसैनिकांकडून हिंदी सक्तीच्या आदेशाची होळी

## मराठी आमची माता तिला माँ होऊ देणार नाही–उल्हास गिराम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जून**

इयत्ता पहिली पासून हिंदी विषयाची सक्ती बळजबरी लादणाऱ्या सरकारच्या या आदेशाची होळी शिवसैनिकांनी बीड मध्ये केली. शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार, मुख्य प्रदोत संपर्क नेते सुनिलजी प्रभू, उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे, संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शन नुसार रविवारी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वा खाली शिवसैनिकांनी आज या आदेशाची होळी केली. यावेळी उल्हास गिराम म्हणाले की, 'मराठी ही आमची मातृभाषा- माता आहे तिला आम्ही माँ होऊ देणार नाहीत'.

केंद्र शासनाच्या नव्या शैक्षणिक हिंदी धोरणाच्या नावाखाली राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्रात करण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला. या सक्ती मुळे मराठी भाषिकांची मने दुखावली गेली. मराठी भाषेचे स्थान दुय्यम होणार. महाराष्ट्रातच मराठी भाषेचा होणारा अपमान मराठी भाषिक सहन करणार नसल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम म्हणाले.आज या सरकार ने जो हिंदी सक्तीचा आदेश काढला त्याच आदेशाची होळी करून शिवसैनिकांनी निषेध नोंदवला यावेळी महिला संघटिका मीराताई नवले, महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रमिलाताई माळी, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजू महुवाले, युवासेना जिल्हाप्रमुख बबलू दिवे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार सेना रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, महादेव परसकर, अक्षय काशिद, सतीश परदेशी, सतीश मस्के, दिलीप पवार, गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, प्रतीक वाघमारे, प्रेम ताकतोडे, रमेश नवले, बलराज कोटुळे, अशोक गायकवाड, जमदाडे, नंदू घोगरे, संजय कुऱ्हाडे आदी शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



## जिल्हा विकासाची 'दिशा'; खा.सोनवणे घेणार आढावा

### विविध खात्याचे विभागप्रमुख उपस्थित राहणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जून**

जिल्ह्यात विविध योजनांतर्गत विकास कामे सुरू असून त्यांचा आढावा घेण्यासाठी दि.३० जून रोजी दुपारी ३ वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली दिशा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित केली आहे. या बैठकीत खा.बजरंग सोनवणे हे विविध विकास कामांना दिशा देण्याचे काम करणार आहेत.



जिल्हा विकास समन्वय समिती व सनियंत्रण समिती (दिशा) ची बैठक आयोजीत केलेली आहे. मागील बैठकीत खा.सोनवणे यांनी विविध विकास कामांचा आढावा घेताना विकास कामांना गती देण्याच्या सुचना दिल्या होत्या. यानंतर आता दि.३० रोजी दिशा समितीची बैठक आयोजित केली असून मागील आठ दिवसांपासून जिल्हा प्रशासनातील अधिकारी या बैठकीची तयारी करत आहेत. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे ग्राम पातळीपासून सर्व अनुभव असलेले नेतृत्व असून त्यांचा जिल्हा परिषदेतील योजनांचा दांडगा अनुभव आहे. यामुळे जिल्हा परिषदेतील अधिकारी तो अनुभव पाहता आपल्याकडून काही उणीव राहणार नाही, याची काळजी घेत आहेत. शिवाय आठ दिवसांपासून सर्व माहिती एकत्रित केली जात आहे. दि.३० रोजी दुपारी ३ वाजता या बैठकीला सुरूवात होणार आहे. या बैठकीत सन २०२४-२५ अखेरचा आढावा घेणार आहेत. तर त्याआधी दुपारी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची, राष्ट्रीय महामार्ग विभागाची तसेच रेल्वे कामांचीही बैठक आयोजीत केली आहे. या बैठकीला अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## गेवराई शहरात दोन कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२९ जून**

नगरपरिषद सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते. नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सोयीसुविधा मिळाल्या - पाहिजेत हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून नगरपरिषद काम करत असते. नगरपरिषद तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्य नागरिक आणि व्यापारी वर्गाला मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी तत्परतेने लक्ष द्यावे असे मत माजी आ. अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने दोन कोटी रुपये विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

गेवराई शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने एक कोटी पन्नास लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी संकुल बांधकामाचा तसेच नवीन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट काँक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शुक्रवारी करण्यात आला. यावेळी भवानी अर्बन बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेश्याम काका येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाइंचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धम्मपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडूदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकूर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे. के. बाबूभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतीष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नवीद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई शहराचे अर्थकारण मजबूत करण्यासाठी शहराला जोडणारे सर्व रस्ते झाले पाहिजेत. गेवराई शहराच्या प्रत्येक भागाचा तसेच जुन्या गेवराई शहराचा विकास झाला पाहिजे असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

## तुलसी शैक्षणिक समूहातर्फे नीट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जून**

तुम्ही भविष्यात कितीही मोठ्या पदावर पोहोचलात, तरी ज्या मातीतून, समाजातून आणि जिल्ह्यातून तुम्ही आलात, त्या मुळांशी तुमची नाळ जुळलेलीच राहू द्या, ती नाळ कधीही तुटू देऊ नका असे प्रतिपादन तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले. नीट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी सोमवार, दिनांक २३ रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

बीड जिल्ह्यातील कृष्णा केशव सुर्वे आणि अनुराग बाबासाहेब मोरे या दोन विद्यार्थ्यांनी देशपातळीवरील नीट परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करत एमबीबीएस साठी पात्रता मिळवली आहे. हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब ठरली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रा.प्रदीप रोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा शाल, पुष्पगुच्छ व प्रेरणादायी पुस्तक देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.पुढे बोलताना प्रा.रोडे यांनी, कृष्णा आणि अनुराग, तुमच्या दोघांच्याही वडिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अतिशय मोलाचे आहे. त्यांच्या कार्याचा आम्हाला विशेष अभिमान आहे, असे सांगत त्यांनी दोघांनाही त्यांच्या आगामी वैद्यकीय शिक्षणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी तुलसी समूहातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पेढे वाटून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या यशाचा आनंद व्यक्त केला.यावेळी तुलसी समूहातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पेढे वाटून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या यशाचा आनंद व्यक्त केला.

## सदाभाऊ खोत यांनी घेतले लोकनेते विनायकराव मेटे यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन



महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री तथा रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ.सदाभाऊ खोत बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. मी बीड जिल्ह्यात आल्यानंतर आज दिवसाची सुरुवात सर्वप्रथम लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांना अभिवादन करून केली असल्याचे सुतोवाच त्यांनी यावेळी केले.

## पोलीस हक्क संघर्ष संघटनेचा दुसरा वर्धापन दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जून**

शाह अल्पसंख्याक बहुउद्देशीय सेवासंस्था संचलित पोलीस हक्क संघर्ष संघटनेचा दुसरा वर्धापन दिन मान्यवरांच्या उपस्थितीत संविधान पुस्तक वाटप करुन आणि होतकरु महिलांना साडीचे वाटप करुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये बोलतांना मान्यवरांनी म्हटले की, पोलीस हक्क संघर्ष संघटनेकडून आतापर्यंत पोलीस भरतीचे पुर्व प्रशिक्षण, स्त्रीयांवरील अन्यायाविरोधात लढा दिला गेला तसेच समुपदेशन करुन समाजातील प्रश्न मिटवण्याचे काम संघटनेने केलेले आहे परंतू आता संघटना विस्तारत असून जबाबदारी वाढत आहे त्यामुळे महिला भगिनींसाठी उपयोगी शिबिर संघटनेने राबवावीत आणि संघटनेने राज्यपातळीवर सर्व ठिकाणी काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाला यावेळी अध्यक्ष अब्दुल कदीर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालक संस्थापक अध्यक्ष झेबा शेख मॅडम, कार्यक्रमाचे उद्घाटक वाहतूक शाखेचे पीएसआय विजय जाधवर, विशेष उपस्थिती राजेंद्र लहानेसर, मुस्तफा खान, बाळासाहेब राखे , नाझिमोद्दीन काझी, वसंत सगळे, सुदाम लाड, बाबुराव बडे, राजश्री देबजे तसेच संभाजीनगर जिल्हा, परभणी जिल्हा, पुणे जिल्हा, बीड जिल्हा, बुलढाणा जिल्हा इथून आलेले सर्व मान्यवर पदाधिकारी महिला व पुरुष मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

## परळी न.पच्या अंतर्गत झालेल्या कामांची इ.स.२०१६ ते २५ वर्षातील श्वेतपत्रिका त्वरित जाहीर करा–बहादुरभाई

### शहरातील नदीवरील अतिक्रमण हटवासह विविध प्रश्नांवर परळी काँग्रेसचे निवेदन

### न.प.प्रशासनाला काँग्रेसचने दिले १५ दिवसाचे अल्टिमेटम

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ जून**

झोपेचे सोंग घेऊन परळी नगर परिषद प्रशासन मुग गिळून करोडो रुपयांचा अफरातफर करत गिळंक्रत करत आहे याचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाच्या वतिने वारंवार श्वेतपत्रिका काढावी म्हणून निवेदने, आंदोलने केले परंतु अद्यापही श्वेतपत्रिका काढु शकली नाही यामुळे भ्रष्टाचाराचा संशय अधिक बळावला आहे.याच निवेदनाची पुन्हा आठवण म्हणून काँग्रेसच्या वतीने परळी नगर परिषदेला देण्यात आले असल्याचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी नगर परिषदेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, न.प.प्रशासनाने २०१६ से २०२४ पर्यतची श्वेतपत्रिका आठ दिवसात प्रसिद्ध करावी, मागील दोन तीन वर्षा पासून आमच्या काँग्रेस पक्षा मार्फत अनेक निवेदन आपणास देण्यात आली जसे की, दुबार टेंडर ची चौकशी, झालेले कामाचे निवेदा काढून कोट्यावधी चे भ्रष्टचार बाबत चौकशी, कामाची गुणवत्ता बाबत, श्वेत पत्रिका प्रसिद्ध करणे बाबत, मनमानी कर मागे घेण्या बाबत, रोड, रास्ते, नाल्या, स्वच्छता, घरकूल, बाबत अनेक निवेदन देऊन सुद्धा एक ही कार्यवाही आपले कार्यालय मार्फत आज पर्यत पर्यंत केली नाही, किंवा त्या बाबत काही कारवाई दिसून येत नाही. डिसेंबर २०१६ ते मार्च २०२५ पर्यंतहची श्वेतपत्रिका दि.५ जुन २०२५ पूर्वीची प्रसिद्ध करावी, पक्षाचे अनेक निवेदन आपल्या कार्यालयात पडून आहे त्यावर कार्यवाही करावी अन्यथा आपण भ्रष्टचाराचे पाठराखण करीत असल्याने आपल्या भूमिकेचे परळी शहर काँग्रेस च्या वतीने दि.दि.५ जुन २०२५ नंतर तिव्र आंदोलन आपल्या कार्यलय समोर करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.तसेच परळी शहरातील सरस्वती नदीवरील, अतिक्रमण तत्काळ हटवणे, मुस्लिम कबरस्थान जवळील आपण केलेले नाला चे नालीत रूपांतर पुन नाल्यात करणे, शादी खाना ते सरस्वती नदी दरम्यान असलेली घाण तत्काळ काढणे व शादीखाना परिसरातील अतिक्रमण ताबडतोब हटवणे अदी बाबत निवेदन देण्यात आले याच बरोबर आहे.न.प.प्रशासनाला काँग्रेसने १५ दिवसाचे अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर शशी चौधरी,इतेशाम खातिब,वैजनाथ गडेकर,दीपक सिरसाट,रुसुल खान, बद्दर भाई, गफारशा, गित्ते इत्यादीच्या स्वाक्षरी आहेत.



## नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जून**

या अगोदर फेब्रुवारी महिन्यात शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या दुकानदारांना तसेच हातगाड्यांवाल्यांना सरकारी जागेवर अतिक्रमण केल्यास काय होते याचा एकवेळ दणका दिल्यानंतरही शहरातील व्यापारी काही सुधरण्याचे नाव घेत नसून पुन्हा मुख्यरस्त्यावर हातगाडे, ओटे, पत्र्याचे शेड दिसू लागल्याने काल दि.२८ जून रोजी नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्यात आली.



सार्वजनिक रस्ते हे सरकारची मालमत्ता आहे ही बाब माहिती असतांना व्यापार्यांकडून नियमांचे उल्लंघन करुन बीड शहरातील बस स्टॅण्ड, साठे चौक, डीपी रोड, अंबिका चौक, राजीव गांधी चौक आदी मुख्य रोडवरील दुकानदारांनी रस्त्यावर केलेले अतिक्रमण, गाडच्यावाले, टपर्यावाले सर्वांचे अतिक्रमण होवू लागले त्यामुळे नगरपालिका आणि वाहतुक शाखेने अतिक्रमण काढून रस्त्यांना मोकळा श्वास घेवू दिला त्यामुळे बीड शहरातील रस्ते मोठे वाटू लागले आणि वाहने व नागरिकांना जाण्यासाठी रस्ता सुलभ झाला होता. यावेळी एपीआय सानप, पीएसआय जाधवर, राजाभाऊ तांदळे, चिंतामणी शिंदे, अजिनाथ मुंडे, विश्वजीत वाघमारे, सिध्दार्थ गोरे, संतोष हरके, मुन्ना गायकवाड, पवन लाहोट ,सुजीत जाधव, वीकी डागट, शरद खुपशे, राम रोकडे, किरण भिसे व इतर कर्मचारी उपस्थित होते.